यकिरणमाला किरण ६ वा.

# शिव-प्रताप

म. ग्रं. सं. ठाणे
१९२८



REFBK-0003726

दु० आ० तिवारी.

हा. क्र.
३०२८

कोश क्र.
३०२८

ग्रंथ संग्रहालय
क्र.
ठाणे

REFBK-0003726



महाकवि भूषण

Ganga Fine Art Press, Lucknow

## श्रीछत्रपति शिवाजी महाराज.



॥ हा भोसले-भूप गाजी शिवाजी तसा भूतलीं म्लेंच्छ-वंशावरी ॥ ४१ ॥

c. s p. p

सं. काव्य 862

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

काव्यकिरणमाला—किरण ६ वा.

# शिव-प्रताप

लेखक

दु० आ० तिवारी, जळगाव.

संपादक व प्रकाशक

मि० का० भोरटके-जळगाव.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. ३७३६

मुद्रक

दत्तात्रेय गोविंद सडेकर,

'धनञ्जय' प्रेस, खानापूर-बेळगाव.

एप्रिल १९२८.

किंमत ८ आणे.

# प्रकाशकाचें निवेदन.

काव्यकिरणमालेचा हा सहावा किरण प्रकाशमान होत आहे; याचें नाव ' शिवप्रताप.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारीं हिंदसरस्वतीपुत्र कविराज भूषण हे होते आणि त्यांनीं महाराजांवर ' शिवाबावनी ' व ' शिवराज-भूषण ' हीं वीररसाचीं उत्कृष्ट काव्यें लिहिलीं, ही गोष्ट आम्हां महाराष्ट्र-रसिकांस केवळ ऐकून माहीत होती. विशेषतः शिवाबावनींत भूषणकवींच्या वीररसात्मक स्फूर्तीचा परिपाक उतरला आहे, अशी तिची प्रसिद्धी आहे. फार काय लिहावें, हिन्दी भाषा ही मूळचीच वीररसाला पोषक असूनही तिच्यांत आजवर शिवाबावनीशीं बरोबरी करणारें काव्य निर्माण झालें नाहीं, इतकी ती अतुल आहे असें हिन्दी प्रोफेसरांचें मत आहे.

अशा या उत्कृष्ट काव्याचें मराठी रूपांतर कवि तिवारी यांनीं केलें व तें काव्यकिरणमालेच्या प्रकाशनास दिलें, याविषयीं आम्ही त्यांचें अंतः-करणपूर्वक आभार मानितों. कविराज भूषणासारखे वीररसाचे प्रख्यात कवि आणि त्यांच्या काव्यरूपांतराला तिवारीसारखे वीररसाचे प्रख्यात महाराष्ट्र-शाहीर हा योग अपूर्व आहे.

प्रसिद्धीपूर्वी ज्यांनीं ज्यांनीं हें काव्य पाहिलें व वाचलें त्यांनीं त्यांनीं याची प्रसन्नतेनें प्रशंसा केली. वाचकांनीं तो अनुभव प्रत्यक्ष घ्यावा. यापेक्षा अधिक लिहिणें नको.

पांचवा किरण ' कुमुद्वती ' व हा सहावा किरण ' शिवप्रताप ' या दोहोंच्या छपाईचीं व बांधणीचीं कामें धनंजय प्रेसचे मालक श्री० सडेकर यांनीं नियमित कालांत मनासारखीं केलीं म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहों.

जळगाव
१ एप्रील १९२८

मि० का० भोरटके.

# प्रस्तावना.

हिंदी भाषेंतील वीररसाचे सत्कवि भूषण याचें छत्रपती शिवाजी-महाराजांवरील ' शिवाबावनी ' नावाचें जें प्रसिद्ध ओजस्वी व तेजस्वी काव्य त्याच्या रूपांतरास ' शिवप्रताप ' हें नांव दिलें आहे.

शिवाबावनींत छत्रपतीवरील एकूण ५२ स्फुट कविता संकलित केल्या आहेत, म्हणून त्यास शिवाबावनी हें नाव दिलें गेलें, पण हें वीर-काव्य इतकें मनोहर, आकर्षक व स्फूर्तिदायक आहे कीं, भूषणकवींची पुष्कळ कविता उपलब्ध असतांही हिंदी लोकांच्या तोंडीं यांतीलच कविता घोळत असतात ! या काव्यांत सर्वत्र छत्रपतींचें शौर्य, त्यांचा दरारा, त्यांच्या सैन्याचें वर्णन, मोंगल व मोंगली स्त्रिया यांची सजा शिवाजीच्या धाकानें उडालेली दैना यांचीं मोठीं बहारीचीं वर्णनें आहेत; म्हणूनच या काव्याच्या मराठी छायेस वरील शिवप्रताप हें नाव दिलें आहे.

कविराज भूषणजींनीं हें काव्य आपल्या काव्यशक्तीच्या परिणतावस्थेंत पूर्ण केलें असल्यामुळें तें काव्याच्या सकल गुणानीं मंडित आहे. मयूरानें आपला चित्रविचित्र वर्णाचा उभारलेला सुंदर पिसारा जसा नेत्रांना आकर्षून घेतो; हिंदुकुशाच्या भव्य कड्यावरून उड्या टाकीत जाणारा सिंधुनदाचा ओघ जसा मनाला थक्क करून सोडतो आणि मेघगर्जने-मागून दिगंत चमकणारी चपला जशी चित्तवृत्ती उन्मुख करून टाकिते, तशी शिवाबावनी रसिकवाचकास व श्रोत्यास सद्यःस्थितींतून शिवछत्रपतींच्या कालांत नेऊन सोडिते आणि त्या वेळचे वीररसाचे देखावे ती इतक्या भव्यतेनें दाखविते कीं, ते पहात असतां भोंवतालच्या परिस्थितीचा विसरच पडतो ! यांत अतिशयोक्ती नाहीं.

शिवाबावनीच्या तेजोगुणाच्या सत्यतेला दोन हिंदी विद्वानांचे अभिप्राय येथें उद्धृत करावेसे वाटतात. इ० स० १८८३ मधील शिवसिंहसरो-जाचे कर्ते म्हणतात:—

"रौद्र, वीर, भयानक ये तीनों रस जैसे इनके (भूषणजीके) काव्यमें है ऐसे और कविलोगोंकी कवितामें नहीं पाये जाते। इन्होंनें (भूषणजीनें) ऐसे ऐसे शिवराजके कवित्त बनाये है की, जिनके बराबर किसी कवीने वीर-रस नहीं बना पाया। "

हिंदी साहित्याचे मर्मज्ञ व भूषणग्रंथावलीचे विद्यमान संपादक पंडित श्यामबिहारी मिश्र एम्. ए. व शुकदेव बिहारी मिश्र बी. ए. हे बंधुद्वय देखील म्हणतात कीं—

"यह (शिवाबावनी) छोटासा ग्रंथ बडाही मनोहर और प्रभावोत्पादक है। इसमे भूषणने शत्रुओंकी दुर्गतीका बडा सुंदर चित्र खींचा है। और शिवराजके प्रताप और आतंकके वर्णन भी बडेही विशद है। हिंदीमे इसके जोडके बहुत ग्रंथ न मिलेंगे."

परंतु मराठी वाचकास हिंदी भाषेचा तादृश परिचय नाहीं. त्यातही या सत्कवीची ती अतर्वेदीची भाषा! तींत कोठें कोठें संस्कृत, फारशी, उर्दू, हिंदी प्राकृत व प्रांतीय शब्द आल्यामुळें महाराष्ट्रीयास हा रसास्वाद घडावा कसा? पुन्हा, शिवाबावनी ही कवित्त छंदांत लिहिलेली आहे. हा कवित्त छंद म्हणजे ज्याला आपण घनाक्षरी म्हणतो तो! मराठींत घनाक्षरींतील फारशी कविता म्हणण्यांत येत नाहीं. तिचें एकच ठळक उदाहरण आहे तें हें कीं—

अवो! कैकयि हें काय, तुवां केलें हाय! हाय!
न म्हणवे तुज माय, जन्मोजन्मीं वैरिणी।

या रडक्या चालीवर हे कवित्त म्हटलें कीं, त्यांचें सर्व ओज व तेज लयाला जातें. भूषण कवींची कविता महाराष्ट्ररसिकास अपरिचित राहिली त्याचें कारण हेंच असावें.

सन १९२२ सालच्या मे महिन्यांत 'महाराष्ट्र साहित्य' मासिकांत प्रस्तुत लेखकानें 'कविराज भूषण' या नांवाचा जो लेख लिहिला, तोच

किंचित् फरकानें कवीचें चरित्र म्हणून या पुस्तकास जोडला आहे. भूषणा-सारख्या सत्कवीची संपूर्ण माहिती या दृष्टीनें त्याचा विस्तार क्षम्य होईल, असें वाटतें. या लेखाच्या शेवटीं भूषणकवीच्या कवितांचें मराठी रूपांतर महाराष्ट्रीयापुढें ठेवण्याचा हेतु व्यक्त केला होता; तो आज शिवप्रतापाच्या रूपानें कांहींसा सफल होत आहे.

शिवाबावनीच्या अनेक जुन्या प्रतींत कवितांचा अनुक्रम भिन्न भिन्न आढळतो. श्रीलक्ष्मी व्यंकटेश्वर छापखान्याच्या मूळ प्रतीवरून प्रथम हें रूपांतर केलें नंतर मिश्रबंधु यांनीं भूषणग्रंथावली संपादित केल्याचें वाचून ती माग-विली. तिच्यांत त्यांनीं कवितांचा अनुक्रम निराळाच लावलेला आढळला. या ग्रंथावलींत जे चार काव्यसंग्रह आहेत, त्यांतील ४-५ कविता शिवाबा-वनींत व शिवाबावनींतील ४-५ कविता त्यांत असाही प्रकार आढळला. या रूपांतरांत श्रीव्यंकटेश्वर प्रेसमधील प्रतींतलिच कविता व त्यांचा क्रम राखला आहे. तथापि पाठभेद व इतर माहिती यासाठीं वरील पुस्तकाप्रमाणें भूषणग्रंथावलीचाही उपयोग झाला.

कविराज भूषण या हिंदशारदाभक्ताची कविता ऐतिहासिक सत्यानें भरलेली, प्रास अनुप्रासादि वर्णवैचित्र्यानें नटलेली आणि नवोपमादि अर्थालंकारानीं बहरलेली असून ज्या कवित्त-छंदात ती लिहिली आहे, त्याचें क्षेत्रही भव्य आहे. हा काव्यगुच्छ उकलून मंदारमालावृत्तात त्याचा मराठी गुच्छ बांधतांना अर्थदृष्टीनें त्याचें मूळ सौंदर्य राखवेल तेवढें राखलें आहे. ३२ व्या कवितेचा अर्थ एका कवितेंत पूर्ण न झाल्यानें तिच्याकरिता दोन कविता लिहाव्या लागल्या. मूळ हिंदी कविता या रूपांतराबरोबर छापण्याची कविमित्रांनीं सूचना केली म्हणून त्या कविताही दिल्या आहेत. रूपांतर मात्र कसें झालें आहे तें रसिकांच्या अभिरुचीवरून ठरेल.

दु० आ० तिवारी.

जळगांव, पू० खान्देश.

# कविराज भूषण.

महाराष्ट्रीय आर्यातील दास्याची शृंखला काढून त्यास स्वातंत्र्यमंदिरांत विराजमान करणाऱ्या पुण्यस्मरण छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण होतांच त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या स्वदेशभक्ती व स्वधर्माभिमान या गुणद्वयाची ज्यानीं जोपासना केली व ते वाढीस लाविले त्या वरिमाता जिजाई, आणि बोधपदेशक दादोजी कोंडदेव हे उभयता सहज डोळ्यापुढें येतात. बाल महाराष्ट्रांतील बाल शिवाजी तारुण्याच्या द्वाराशीं येतात तों त्यास काय आढळून आलें ? दिशादिशांतून घुमणारा, हृदयाला पीळ पाडणारा आणि शूर देशभक्तांच्या रक्ताला उसळी देणारा जन्मभूमीचा आर्तरव त्यांच्या कानीं आला ! आप्तस्वकीयांच्या, स्वधर्मीयांच्या हाल-अपेष्टा डोळ्याला दिसू लागल्या. कोठेही जा, कितीही रडा, जीवाला वैताग आणा, पण मान नाहीं, किंमत नाहीं, फिकीर नाहीं ! वधस्थानावर ओढून नेल्या जात असलेल्या गोमाता हंबरडे फोडून मागें वळून वळून पाहताहेत, पण त्याचे भक्त स्वस्थ बसलेले ! पवित्र देवालयाचा व देवाचा विध्वंस होत असता त्यांचे उपासक रडत बसलेले ! बळजबरीनें बाटविले जाणारे देशबंधु असहाय आक्रंदत असता स्वजन म्हणविणाऱ्याना त्यांच्या बरोबर कपाळावर हात मारून आक्रंदल्यावाचून काहीं प्रतिकार करिता येत नाहीं ! अशा दुर्धर परिस्थितींत ज्यानीं जुलमी अधिकाऱ्यास सलाम करावयाचा हात समशेरीस घातला आणि 'हुजूर हुजूर' म्हणून दोन्ही हातांनीं पसरावयाचा शेला कमरेस गुंडाळला, त्या भोंसले कुलावतंस तरुण छत्रपतीच्या पराक्रम व शौर्यरूपी बालवृक्षास आपल्या निर्मल सरस्वतीचें सलिल सतर्पून कोणी संवर्धित केलें ? तर एका महाराष्ट्र-कवीनें ! ते कवि श्रीसमर्थ रामदास होत; हीही गोष्ट सर्वांस ठाऊक आहे.

परंतु श्रीसमर्थांच्या बरोबर छत्रपतींच्या उपरिनिर्दिष्ट गुणांना अधिक तेजस्विता आणणारा आणखी एक कवि होऊन गेला; तो म्हणजे हिन्दु-

शीरदाभक्त कविराज भूषण होय. हिंदी भाषा भूतलावर अवतीर्ण झाली ती वीर, रौद्र आणि भयानक या रसांचा अवलंब घेऊनच अवतरली, म्हणून हिंदी भाषा ही वीररसाच्या परमोच्च पदाला आधींच प्राप्त झाली आहे. कारण हिंदीचा आद्य काव्यग्रंथ चंदकविकृत ' पृथ्विराज रासो ' हाच म्हटला जातो व तो वीररसानें ओथबलेला आहे. या हिंदीच्या वीररसाचें तेज भूषण कवीच्या रूपानें सोळाव्या शतकांत महाराष्ट्रांत प्रवेशलें आणि पृथ्विराज-जयचंद ही राजकवींची जोडी जशी अजरामर झाली तशी शिवराज-भूषण ही जोडी अजरामर झाली ! आश्चर्याची गोष्ट ही कीं, एका हिंदसरस्वतीकुमारानें आपल्या हिंदी वाणीनें महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यभक्तास वेळोवेळीं प्रस्फुरित करावें ! आणि असें असून आम्हांपैकीं पुष्कळांस त्याच्या त्या वीररसप्रधान कविता अथवा त्यांचें चरित्र ठाऊक नसावें ! भूषण नुसता कवि नव्हता तर तो महाकवी होता. पदोपदीं वाचकास चकित करून टाकणारी रचना, भाषेची शुद्धता, अर्थाचा गौरव, पदाचें लालित्य व उत्तमोत्तम अलंकारांची मांडणी हे महाकवीचे गुण त्याच्या काव्यांत स्पष्ट दिसतात. हिंदी रसिक प्रोफेसर देखील भूषणाच्या नावामागें महाकवी हें उपपद लावीत आले आहेत आणि त्याचे काव्यग्रंथ हिंदी पदवीधरांच्या परीक्षांत ठेवण्यात आले आहेत.

अशा या कवीचे शिवराजभूषण, शिवाबावनी, छत्रसालदशक व स्फुटसंग्रह असे चार काव्यसंग्रह उपलब्ध आहेत व भूषणहजारा, भूषणउल्लास वगैरे ग्रंथ अनुपलब्ध आहेत. उपलब्धांपैकीं शिवराजभूषण व शिवाबावनी हे दोन ग्रंथ श्री छत्रपती शिवाजीमहाराजांवरच रचले आहेत.

---

१ " भूषण महाराजका काव्य वास्तवमें हिंदी साहित्यका भूषण है। स्थिरलक्षणानुसार चाहे इनकी कविताको कोई महाकाव्य संस्कृतरीति ग्रंथोंमें न कह सके, परंतु तोभी इन्हें हम बिना महाकवि कहे नहीं रह सकते।"

पं० शामबिहारी मिश्र एम्. ए.

पहिला ग्रंथ अलंकारबद्ध आहे व दुसरा ' शिवाबावनी ' हा स्फुट संग्रह आहे. तथापि हा इतका तेजस्वी आहे कीं, यांतील कविता शिवराजभूषणानंतर झालेल्या असाव्या असें अनुमान निघतें. प्रस्तुत पुस्तकांत शिवाबावनीच्या ५२ कवितांचें मंदारमालावृत्तांतील रूपांतर दिलें आहे. त्या विषयींची विशेष माहिती प्रस्तावनेंत वाचकांस वाचावयास सांपडेल. तथापि भूषणाचें पूर्वचरित्र काय? तो अंतर्वेदींचा हिंदी कवि दक्षिणेंत आला कसा व छत्रपतींचा व त्याचा संबंध जुळला कसा? वगैरे गोष्टी बऱ्याच मनोरंजक आहेत व त्या या काव्याच्या वाचकांसच केवळ नव्हे, तर सर्व महाराष्ट्रीयांस माहीत असणें अवश्य आहे.

जिच्या तीरावर गोपालकृष्णानीं आपली मनोहर बांसरी वाजविली व गाई चारिल्या, त्या यमुनेच्या कांठीं कानपूर प्रांतात जें हल्लीं टिकमापूर नांवाचें गांव आहे, तें या कवीचें जन्मस्थान होय. याचा परगणा व डाकखाना घाटमपूर आहे व मौजे ' अकबरपूर बिरबल ' या गावाहून टिकमापूर केवळ दोन मैलांवर वसलें आहे. कानपुराहून हमीरपूरला जी पक्की सडक गेली आहे, त्या सडकेच्या बाजूस ३० मैलांवर घाटमपूर आहे. तेथून ७ मैलांवर ' सजेती ' गांव आहे. या सजेतीपासूनही टिकमापूर दोन मैल आहे. याचें पूर्वीचें नांव त्रिविक्रमपूर होतें.

भूषणकवि कान्यकुब्ज ब्राह्मण, कश्यपगोत्री त्रिपाठी ( तिवारी ) होते. यांच्या वडिलांचें नांव रत्नाकर असून ते अपूर्व कवितासंपन्न व देवीभक्त होते. या कवि रत्नाकराच्या पोटीं देविप्रसादानें चार कविरत्नेंच निर्माण झालीं. चिंतामणी, भूषण, मतिराम आणि नीलकंठ ऊर्फ जटाशंकर या चौघां बंधूंत वडील चिंतामणी हे बरेच दिवसपर्यंत नागपूरचे सूर्यवंशी राजे चक्रदशाह भोसले यांचे आश्रित होते. नंतर मोंगल बादशहा शहाजहान यांच्या आश्रयाखालीं ते राहिले. यांनीं छंदविचार, काव्यविवेक, कविकुलकल्पतरु आणि रामायण हे चार ग्रंथ लिहिले. आपल्या नांवांतील

अल्प शब्दांवरून यांनीं कांहीं कवितांत ' मणिलाल ' या नावानें स्वतःचा उल्लेख केला आहे.

अकबराच्या पदरीं जगन्नाथराय व गंग कवि होते. सेलिमाचे कांहीं सांगता येत नाहीं, पण शहाजहानच्या पदरीं वरील चिंतामणी होते व औरंगजेबाच्या दरबारीं भूषणजी कांहीं दिवस होते. यावरून मोंगल राजाच्या दरबारीं एतद्देशीय कवींची संभावना होती, असें ठरतें.

भूषणजींचे कनिष्ठ बंधु मतिराम हेही काव्यरचनेंत चतुर व अलंकारमर्मज्ञ होते. कमाऊनचे राजे उदयचंद भावसिंहहाडा कोटा, पन्नाचे राजे छत्रसाल आणि छत्रपती शिवाजी महाराजाचे पुत्र संभाजी यांच्या दरबारीं ते राजकवि म्हणून राहिले. यांनीं ललितललाम, छंदसार व रसराज हे तीन ग्रंथ लिहिले. सर्वांत धाकटे बंधु नीलकंठ उर्फ जटाशंकर यांचा सन १६४१ त लिहिलेला अमरेशविलास नावाचा ग्रंथ नुकताच उपलब्ध झाला आहे.

भूषणकवी व त्यांचे बंधु यांच्या ग्रंथांवरून विद्वानांनीं ही गोष्ट सिद्ध केली आहे कीं, भूषणकवींचा जन्म इ० स० १६१५ च्या सुमारास झाला आणि ते शतायु होऊन इ० स० १७१५ च्या सुमारास त्यांनीं आपली जीवितयात्रा संपविली. थोर पुरुषांची चरित्रें लिहून ठेवण्याचा आमच्या इकडे परिपाठ नसल्यानें, त्यांच्या जन्ममृत्यूच्या नक्की तारखा कळत नाहींत. अशा अडचणी पुष्कळ महापुरुषाच्या बाबतींत आलेल्या आहेत.

ही तर गोष्ट प्रसिद्धच आहे कीं, पूर्वीं भूषण कवीस कवितेचा गंधही नव्हता, ते अगदीं निरक्षर होते. भूषणजींचे बंधु राजकवि-पदावर शोभत असतां ते स्वतः कांहींही लेखनवाचनादि व्यासंग न करितां आळशासारखे घरांत पडून असत. या गोष्टीची अर्थातच लोकांत चर्चा सुरू झाली तिन्ही बंधु विद्वान् आणि कवि असून हे एकटेच अविद्वान् कसे ? हा अनादर इतका वाढला कीं, एके दिवशीं भोजनाच्या वेळीं भूषणजींनीं आपल्या वहिनीकडे मीठ मागितलें, तेव्हां तीं रागानें म्हणाली, " हो,

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.

तुम्ही आपणांस मीठ कमाऊन ठेविलें आहे कां, कीं मी तें उचलून आणूं !" भावजयीची ही वक्रोक्ति ऐकतांच भूषणजीस अत्यंत विषाद उत्पन्न झाला. त्यांनीं तोंडांतील घास उगळून टाकला आणि म्हटलें " ठीक ! आतां जेव्हा मीठ कमाऊन आणूं तेव्हांच येथें येऊं !" पतीच्या गुणानें अहंकृत होऊन भावजईनें उच्चारलेल्या त्या मर्मभेदक शब्दानीं त्यांच्या अंगाची लाही झाली. तेजस्वी घोड्याला जसा एकच चाबूक, सतीला जसा लांछनाचा एकच शब्द, निर्दोष व्यक्तीला जसा एकच वक्र शब्द, तसे ते शब्द त्याना विषारी बाणासारखे झोंबले आणि ते तत्काल घराबाहेर पडले. महत्पदाविषयीं कृतनिश्चय अशा त्या बालध्रुवानें, चिरस्थायी कीर्ति मिळवीन, तेव्हांच तोंड दाखवीन, अशा दृढ संकल्पाच्या या रामशास्त्री प्रभुण्यांनीं शारदेची खडतर तपश्चर्या केली.

त्यास कवितादेवी प्रसन्न झाल्यावर ते कमाऊनच्या राजाकडे गेले व त्यास त्यानीं आपल्या वीररसप्रचुर काव्यानें संतोषित केलें. कमाऊनच्या राजानें त्यास एक लाख रुपये देतांना गर्वोक्तीनें म्हटलें, " असा दाता तुम्हास पृथ्वींत आढळणार नाहीं ! " आपल्या कवितेनें सर्व दरबार चित्रासारखा तटस्थ करणाऱ्या आणि राजलक्ष्मीच्या मंदिरांत सरस्वतीदेवीचें निःसंशय प्रभुत्व प्रस्थापित करणाऱ्या प्रासादिक कवीपुढें आपण संपत्तीची काय प्रौढी मिरवितों, याचा कमाऊन नरेशानें विचार केला नाहीं. लक्ष्मी आणि सरस्वती यांच्या परीक्षेचीच ती वेळ होती, आणि अशा वेळीं दुसरा कोणी सामान्य कवी असता, तर तो लाख रुपयाच्या मोहानें राजाची गर्वोक्ति घटकाभर सहन करून घेता; पण तेथें महाकवी उभा होता, सामान्य कवी उभा नव्हता. भूषणजींनीं तात्काल उत्तर दिलें कीं, ' असे दाते तर भूमंडलावर पुष्कळ आहेत; पण तुम्ही असा याचक पाहिला नसेल कीं, जो तुम्ही अहंकारानें दिलेल्या लक्ष रुपयानाही तृणासारखे समजून त्यांस स्पर्श करण्यांत कुंठी मानितो ! "

कांहीं ग्रंथकारांचें मत असें आहे कीं, भूषण कवीची व कुमा- उनच्या राजाची भेट शिवाजी महाराजांच्या भेटीनतर झाली. कांहीं असो; पण या अपूर्व निस्पृहतेनें भूषण कवीचें नाव सर्वतोमुखीं झालें. यापुढें चित्रकूटाधिपती हृदयरामाचे पुत्र रुद्रराम सोलंकी याच्या आश्रयाला भूषण कवि राहिले. तेथेंच त्यास इ० स० १६६६ च्या सुमारास हृदयरामाकडून " कविभूषण " ही पदवी मिळाली; आणि तेव्हापासून ते भूषण या नांवानेंच प्रसिद्ध झाले. त्याचें मूळचें नांव कांहीं निराळेंच असावें. ही कविभूषण पदवी मिळाल्याचा स्वतः भूषणकवींनेंच उल्लेख केला आहे कीं—

कुल सुलंक चित्रकूटपति साहस सील समुद्र ॥
' कविभूषन ' पदवी दई हृदयरामसुत रुद्र ॥

( शिवराजभूषणकाव्य क० नं० २८ )

भूषणकवींच्या वीर्यशाली कवितेचा प्रभाव इतका गाजला कीं, येथून पुढें त्याचा औरंगजेबाच्या दरबारीं प्रवेश झाला. औरंगजेब कसला विचित्र होता, हें इतिहासज्ञास विदितच आहे. ज्यानें गायनकलेचा उच्छेद केला, ततुवाद्यावर कर बसविला, देवालयावर मशिदी उभारिल्या, मूर्तींचें पीठ करून तें नदींत फेंकून दिलें व परधर्मीयांवर झिझिया नांवाचा कर बस- विला ! अशा अन्यायी, अरसिक व कठोर बादशहाच्या दरबारीं कवि आणि तोही हिंदू ही अगदीं विसदृश गोष्ट कोणास खरीसुद्धां वाटणार नाहीं.

परंतु " वार्ताविनोद " नावाच्या पुस्तकात शाह औरंगजेब आणि कविभूषण ' या नांवाखालीं एक लेख प्रसिद्ध झाला होता; त्यावरून व इतरही बऱ्याचशा गोष्टीवरून या दोघांविषयीं विविध माहिती मिळते; व ती भूषणकवींची कविता आणि ऐतिहासिक घटना यांशीं जुळते. औरंग- जेब हा दरबारी कवींच्या गुणाचा कांहीं मोठा चहाता होता असें नाहीं; वाडवडिलांपासून चालत आलेला परिपाठ पुढें चालवावयाचा व दरबार असंतुष्ट होऊं द्यावयाचा नाहीं, या हेतूनेंच त्यानें आश्रित ठेविले होते.

कोणी कवीनें त्याच्या स्तुतिपर कविता करून त्याला म्हणून दाखविली कीं, दाढीवरून हात फिरवून, मिशीला पीळ भरून हसत हसत तो आपल्या भिवया नाचवीत असे, व स्वतःला मोठा रसज्ञ, सुविचारी व बुद्धिमान् समजत असे ! अत्याचार हा त्याचा धर्म, अविचार ही त्याची नीति व जुलूम हा त्याचा न्याय होता ! त्याचा आपल्या मुलावर देखील विश्वास नव्हता. गुणानें कीर्तिमान् झालेला कोणीही त्याला बघवत नसे; कारण न जाणो, हा बलवत्तर होऊन माझें राज्य हिराऊन घेईल, असें त्यास वाटे !

अर्थात् त्याच्या भोंवतीं असणारे पुष्कळसे हिंदी व फारशी कवी हे त्याचें स्तुतिगीत गाणारे व 'हुजूर हुजूर' करणारेच असावयाचे. ज्यांची माहिती आम्ही देत आहों, तेही त्यांपैकींच होते कीं काय, ती हकिकत पुढें येणारच आहे; पण थोडें लिहावयाचें आहे कीं, आत्मस्तुति कोणाला प्रिय नसते ? देवच जर मुळीं स्तुतिस्तोतारणप्रिय आहेत, तर मग मानवाची गोष्ट कशाला ? स्विफ्ट म्हणतो:—

"श्रेष्ठ लोकांतही थोड्यांना जरी स्तुतीचा कंटाळा असतो, तरी बहुतेकांच्या हृदयात स्तवनप्रियता गुप्तपणें संचार करीत असते."

यथार्थ गुणांची, सुविचारी आणि सत्यवादी अशा निःपक्षपाती विद्याविभूषणाकडून होणारी प्रशंसा ही स्तुति नसून ती सत्कीर्ति होय. ही सत्कीर्ति प्रतिष्ठाभाजन बुद्धिवानास मान्य असते; परंतु मिथ्या प्रशंसा ही खुशामत ठरते; म्हणून श्रेष्ठ लोक तिला महत्व देत नाहींत; तो एक असाध्य रोग आहे. कीर्ति आणि खुशामत यांचें एका ठायीं वास्तव्य कल्पिणें, ही बुद्धिभ्रंशता होय. औरंगजेब तर मिथ्या प्रशंसा कीर्तिप्रद मानून फुगविलेलें अंग तोलण्यास असमर्थ होऊन जणो उत्तानपाद होत चालला होता ! आणि कविही त्यास 'नौरंगजेब,' 'नौरंगशाहा' अशीं निवडक निवडक विशेषणें देऊन स्तवित होते !

औरंगजेब मयूरसिंहासनावर बसला आहे, भोंवतालीं अमीर, उमराव, पठाण यांनीं व कविलोकांनीं दरबार नटला आहे, अशा एका समयीं कवींनीं आपल्या नूतन कवितांनीं बादशहाची पुष्कळ स्तुति केली; ती ऐकून तो प्रसन्न तर झालाच; पण म्हणाला:—

" मी पुष्कळ दिवसांपासून पहात आहे कीं, तुम्ही उत्तरोत्तर माझी तारीफ करितां ! माझ्यांत कोणताही दुर्गुण नाहीं काय ? असा तर कोण-ताही मनुष्य आढळणार नाहीं कीं, ज्यांत दुर्गुण नाहीं; तर मग कवि-लोकाचें हें कार्य नाहीं काय कीं, आपल्या स्वामीचे दुर्गुण नाहींसे करून त्यास सद्गुणी बनवावें ? याचें उत्तर द्या. माझे यथार्थ दोष दाखविणारा तुमच्यांत कोणी नाहीं काय ? "

इतरांच्या अंतःकरणाचा कुटिल मनानें शोध घेणाऱ्या बादशहाचा वरील प्रश्न विचारण्यांत असा एक हेतु होता कीं, कविजनांत असा कोणी स्वतंत्र मनाचा आहे काय कीं, जो परोक्ष माझी निंदा करीत असेल ? शहाचे वरील सडसडीत बोलणें ऐकून खऱ्या कविचंद्राच्या उदयापूर्वी खद्योतासारखे चमकणारे जे होते ते लपून गेले, औरंगजेबासारख्या बादश-हाच्या तोंडावर त्याचे दोष सांगावयाचें धैर्य कोणास होणार ? जो तो आश्चर्यानें व अवाक्स्थितीनें दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहूं लागला, ओठ सुकून गेले !

सर्वांची ही समय स्थिति पाहून कविमंडळांतून एक तरुण तेजस्वी कवि ताडकन् उठला आणि निर्भय वाणीनें म्हणाला:—

" मालिकशहा ! स्तुति ही ईश्वरालाही प्रिय आहे; मग ती मनु-ष्याला प्रिय असावी यांत नवल काय ? तथापि दैवाच्या चमत्कारिक गोष्टीही देव ललाटांत झांकून ठेवतो ! म्हणून आम्ही कवीदेखील मोठ्याचा मोठेपणा जगापुढे मांडित असतों आणि त्याच्या व्यंगाविषयीं मौन धारण करितों; पण ज्याअर्थी आपला हुकूम झाला, त्याअर्थी मला

उठावें लागलें ! शहेशाह ! खरे दोष सांगणारे तर पुष्कळच सांपडतील; पण ते ऐकून घेणाराच मर्द सापडत नाहीं. आपण मर्द होऊन ऐकायला तयार असाल, तर ते सांगायला मी तयार आहें ! "

त्या बाणेदार कवीची ही प्रामाणिक आणि निर्भय वाणी ऐकून औरंगजेब काहींसा प्रसन्न झाला; परंतु सत्यप्रतिपादनीय विषयात विचार करू लागला कीं, न जाणो हा निस्पृह कवि माझीं कोणकोणतीं व्यंगें बाहेर काढील ! थोडा वेळ विचार करून नंतर तो म्हणाला:—" कविराज भूषण! तू माझे खरे खरे दोष कोणते तें सांग,मी ऐकायला तयार आहे."

क० भूषण:—ठीक ! पण शहेशाह ! माझी खात्री आहे कीं, जेव्हां मी आपली खरी कीर्ति सांगेन, तेव्हां आपली मिजास ठिकाणावर राहणार नाहीं; आणि माझें शीर धडापासून वेगळें करण्यात येईल ! म्हणून मी विनंती करितों कीं, आपण आपल्या आज्ञेचा फिरून एक वार विचार करा.

शहा:—नाहीं, कविराज नाहीं. मी आज तुमचे सर्व अपराध माफ करितों. सत्यनिवेदनांत आपणाकडून जे जे अपराध होतील, ते आज तुम्हास माफ केले जातील.

क० भूषण:—आपलें या वेळचें बोलणें उचित आहे, पण माझ्या दोषदिग्दर्शनाबरोबर तुमची ही वृत्ति राहणार नाहीं, ती कांहीं निराळी होऊन जाईल. या उपर आपली इच्छाच असेल, तर मला आपलें निर्भयपत्र द्या व त्यावर येथे बसलेल्या अमीरउमरावाच्या व रजपूत रावठाकुराच्या ग्वाही घालून द्या ! म्हणजे मी प्रारंभ करितों.

औरंगजेबानें त्या धुंदींत भूषणाच्या इच्छेप्रमाणें आपल्या शिक्कामोर्तब्याचें त्यास अभयपत्र दिलें, आणि त्यावर अमीरउमरावाच्या ग्वाहीही घालून दिल्या. बादशहाचें तें फर्मान आपल्याजवळ व्यवस्थित ठेवून कविराज भूषणानें एकवार सर्व सभेकडे पाहिलें आणि नंतर औरंगजेबाकडे दृष्टि रोंखून पुढील कवित्त म्हटलाः—

किबलेको ठौर बाप बादशहा शहाजान, ताको कैद कियो मानो मक्के
आग लाई है
बडो भाई दारा वाको पकडके कैद कियो, मेहेरहु नाही माको जायो
सगो भाई है.
बधु तो मुरादबक्स बात चूक करबेको, बीच लै कुरान खुदाकी कसम खाई है.
कहत भूषन भाट सुनहू नौरंगजेब, ऐसे काम किये फेर पादशाही पाई है.

( कुटुंबातील मुख्य जो शहाजहान बादशहा, त्याला त्वा कैद केलेस, जणो मक्केला आग लावण्यासारखें हें कृत्य ! वडील भाऊ दारा त्यालाही कैद केलेंस, पण विचार केला नाहीं, हा माझा सख्खा भाऊ आहे ! मुराद तर मूळचाच मूर्ख; पण त्याच्यात आणि आपल्यात कुराण ठेवून तूं शपथ वाहिलीस ! भूषण कवि म्हणतो हे औरंगजेबा ! ऐक तू इतकीं पापें केलीं, तेव्हा तुला बादशाही मिळाली आहे* ! ! )

---

१ औरंगजेबाची ही शपथ अशी कीं, " तुला गादीवर बसवावयाचें व मला मात्र फकीर होऊन मक्केस जावयाचें ! "

* भूषणग्रंथावलीचे संपादक महाशय मिश्रबंधु यास भूषण व औरंगजेब यांची ही भेट अग्राह्य वाटते ते म्हणतात, " भूषण कवि चित्रकूटाधिपती रुद्ररामाकडून निघाले ते छत्रपति शिवाजी महाराजाकडेच आले, ( इ० स० १६६७ ) औरंगजेबाकडे गेले नाहींत. " पंडित महाशयानीं त्यांच्या या मताला कांहीं आधार दिला असता, तर बरं झालें असतें. इतरांप्रमाणें वरील दोन्ही कविता स्वसंपादित प्रतींत त्यांनीं संकलित केल्या आहेत. या दोन्ही कवितांचें स्वरूप पाहता त्या कवीनें शहाच्या समक्ष म्हटलेल्या दिसतात. विशेषत " भूषण कवि सांगतो, औरंगजेबा ! ऐक " हे पहिल्या कवितेतील उद्गार तर त्या उभयतांची समक्ष स्थितीच व्यक्त करितात. त्याचप्रमाणें—" शंभर शंभर उंदीर खाऊन ही मांजरी ( औरंगजेब )

या कवितेचा एकेक शब्द शहास कट्यारीसारखा लागत गेला ! त्याचें विकृतानन आणि भ्रूभ्रमण यांनीं मनोगत क्रोधाचें सात्त्विकस्वरूप दिसू लागलें. भूषणानें त्याची परवा न धरितां धडाडीनें दुसरा कवित्त म्हटलाः—

हाथ तसबीह लिये प्रात उठि बंदगी को, आपही कपटरूप कपट सुजपके !
आगरेमें जाय दारा चौकमें चुनाय लीन्हें , छत्रही छिनायो मानो बूढे मरे बापके!
कीन्हो है गोत्रघात सो तो मैं नाहिं कहौं,पीलपै तुराये चार चुगलनके चटके!
भूषन भनत शठछंदी मतिमंद महा,सौ सौ चूहे खायके बिलारी बैठी तपके!

कटु शब्दाची कट्यार आणि ज्वलद्वक्रोक्तीचे विषधर बाण यांनीं औरंगजेबाच्या शरिराचा पहिल्याच कवितेनें दाह झाला होता. त्यात मधून मधून निरंकुश रजपुतांचें भूषणास ' धन्य धन्य ' म्हणून प्रोत्साहन देणें, हें त्याच्या प्रज्वलित क्रोधाग्नीत घृताहुतीप्रमाणें झालें ! डोळे दीपशिखे-प्रमाणें चंचल होऊन शनिनेत्रासारखे आरक्त झाले ! शरीर भस्मीभूत

---

पुन्हा ( सिंहासनावर ) टपून बसली आहे ! हेही दुसऱ्या कवितेंतील उद्गार समक्ष निवेदनाचेच दर्शक आहेत.

या दोन कवितांची रचना देखील अशी आहे कीं, तें जवळ जवळ पद्यात्मक गद्यच आहे ! तात्काल म्हणावयाच्या कवितेचें स्वरूप सामान्यतः असेंच असावयाचें. एखाद्या शीघ्रकवीची कविता ज्यांनीं ऐकली असेल त्यास हें कळून येईल. भूषणाच्या इतर कवितांत प्रासानुप्रासाच्या लाटा जशा उसळत असतात, तशा येथें उसळत नाहींत. अलंकाराची मांडणी, अर्थाचा गौरव यांनीं नटलेल्या याच कवीच्या कवितांशीं या कविता तोलता येत नाहींत.

" चकित चकित्ता चौंक चौंक उठे बार बार, दिल्लि दहशाति चित्त चाहे खरकती है "
" बिलखति मुख बिलखाति बिजापुरपति, फिरत फिरंगिनकि नारि फरकती है "

म्हणावयास लागलें ! या दुसऱ्या कवितेच्या शेवटीं कवीनें शहास उद्देशून जी अंतिम रचना केली कीं—

" सौ सौ चूहे खायके बिलारी बैठी तपके !

ती बादशहास सर्वतोपरी असह्य झाली, सर्वांग थरारून उठलें, नेत्रांतून क्रोधाग्नीचे स्फुलिंग प्रस्फुटित होऊं लागले ! आपल्या वचनबद्धतेची सीमा ओलांडून अहंमन्य, अहमिति स्वभावाच्या औरंगजेबानें झट्दिशी म्यानातून तरवार बाहेर काढिली ! आणि सत्यपूतवाक् कविराज भूषणाचा शिरच्छेद करण्याकरितां तो सिंहासनावरून गर्जना करून उठला! हा प्रकार पाहताच ग्वाहीदार अमीरउमरावांनीं आणि वचनप्रिय रजपूत सरदारांनीं मध्यस्थी करून व या अनीतीनें होणाऱ्या दुष्कीर्तीचें भय दाखवून शाहास शांत केलें !

---

एकाच कवितेच्या या दोन ओळींत अनुप्रासांच्या किती लाटा उसळत आहेत ! अर्थाचा चित्रपट तरी किती स्पष्ट उभारला गेला आहे.

या कवीश्वरास रुद्राम नरेशाकडून 'कवि-भूषण' ही पदवी सन १६६६ च्या सुमारास मिळाली, आणि इ० स० १६६७ च्या शेवटीं शेवटीं ते छत्रपतींच्या दरबारात दाखल झाले; असें मिश्र पंडितांनीं अनेक आधारानें सिद्ध केलें आहे. आम्हास तर बहुतांशीं असेंच वाटतें कीं, या एक वर्षाच्या अवधींत भूषणकवि आपले बंधु जे चिंतामणी यांच्या योगें औरंगजेबाच्या दरबारीं प्रविष्ट झाले असावे आणि तेथें १६६६-६७ च्या कालांत श्री छत्रपतींची जी औरंगजेबाशीं भेट झाली त्या प्रसंगीं अपमानानें त्यांचा जो क्रोधसमुद्र उचंबळला व त्यामुळें सर्व दरबार जो भयग्रस्त झाला, तो वीरप्रसंग या वीररसप्रिय कवीनें पाहिला असावा आणि नंतरच शहाचा व त्याचा बिघाड पडून हा हिंदी सत्कवी दक्षिणेंत आला असावा, हें अनुमान बरोबर ठरतें.

औरंगजेब शांत झाला; परंतु त्याच्या क्रोधदग्ध हृदयाची ज्वाला शांत झाली नाहीं. त्यानें कृपाण म्यानांत घातला व कर्कश आवाजांत कवीला आज्ञा केली–

" हे भूषणा ! तू माझ्या समोरून जा ! मला तोंड दाखवूं नकोस. मी तुझें तोंड पाहूं इच्छित नाहीं. आज या विचारवंत व प्रतिष्ठित सभाजनांच्या आग्रहावरून मी तुझा जीव वांचविला आहे; परंतु लक्षात ठेव कीं, प्रसंग येतांच भूमण्डळ आणि आकाश यांतून तुला अलग केलें जाईल ! "

कविराज भूषणजींनीं त्याची गोष्ट ऐकल्या न ऐकल्यासारखें करून निश्चित

---

नाहींतर बुंदेलखंडचे राजे, झाडाकोटाचे राजे, जयपूर जोधपूरचे राजे हे हिंदी कवितेचे रसिक उत्तर हिंदुस्थानांत असता व यांपैकीं कांहींच्या दरबारीं भूषणकवीचे इतर बंधु राजाश्रित असतां त्यांनीं अंत-र्वेदी सोडून दक्षिणेंत इतक्या लांब कसें यावें ? आणि मराठी भाषेच्या प्रांतांत हिंदी कवितेचें प्रभुत्व गाजवावें कसें ?

शहा-छत्रपतींच्या भेटीचें वर्णन भूषणकवीनें फार बारकाईनें केलें आहे. ही भेट होण्यापूर्वीं गुसलखान्यांत ( खलबतखान्यांत ) औरंगजेबानें रामसिंग व इतर विश्वासू अमीर यांजबरोबर छत्रपतींविषयीं खलबतें केलीं. कारण त्याला त्यांची भारी भीति वाटत होती. न जाणो हा दक्षिणचा सिंह उफाळून अंगावर येईल म्हणून त्यानें तख्तापुढें शस्त्रें बांधविलीं होतीं ! मिश्र पंडित म्हणतात " भूषणकवी एखादी अद्भुत गोष्ट जरी असली तरी ती एक वेळा सांगून सोडून देतात, तिचें वारंवार कथन करीत नाहींत; पण या गुसलखान्याचें वर्णन त्यांनीं जेथें तेथें केलें आहे !" ही आश्चर्याची गोष्ट तर खरीच, पण या आश्चर्याचें कारण हेंच होय कीं, शिव-शहांच्या भेटीच्यावेळीं भूषणकवि प्रत्यक्ष तेथें असावे व त्य' अद्भुत दृश्यानें त्याचें शौर्यप्रिय हृदय छत्रपतींकडे आकर्षिलें गेलें असावें.

मनानें एखाद्या गजासारखें झुलत तेथून पाय काढला. घरीं येऊन देवयानवत् वेगवान् अशा आपल्या ' केसर ' घोडीवर बसून त्यानीं तेथून निघून जाण्याची तयारी केली.

भूषण दरबारांतून निघून गेल्यावर औरंगजेबाच्या मनांत उत्पन्न झालेल्या उद्वेगानें तो जुम्मामशिदींत नमाज पढावयास गेला. त्यावेळीं त्याच्या दुष्कृत्यावर कोणत्यातरी समजुतीनें पांघरूण घालणारे असे हाजीखोर कांहीं कवी व लांगूलचालन करणारे असे कांहीं लोक होते. जेव्हां औरंगजेब नमाज पढून शीतल मद्वायूनें मन प्रसन्न करण्याच्या पराकाष्ठेंत मार्गावरील एका बुरजावर बसला होता; तेव्हा तो असें भासवीत होता कीं खरोखरच भूषणानें माझा मोठा अपमान केला; तो सहन करण्याकरितां आणि भोंवतालच्या लोकविनतीस मान देण्याकरितां आपण आपल्या अंतर्वेदना कष्टानें सहन करीत आहों.

इतक्यात कविराज भूषण आपल्या विद्युद्गमनी केसरीवर बसून तिकडून आले ! आणि शहाला नमन न करिता हांजीगिरीच्या पक्क्या भाटांना नमस्कार केला ! शहानें या अपमानाचें दुःख आंतल्या आत दाबून त्या भाटाला खूण करून त्याजकडून भूषणास प्रश्न करविला कीं, " बादशहाशीं शत्रुत्व संपादून तू कोठें जाशील ? दिल्लिपती शहान् शहाच्या शत्रूला आश्रयस्थान देणारा कोण आहे ? " त्या भाटानें शहाच्या आज्ञेवरून " है रंग नौरंगशाहको और न दूजो रंग—" इत्यादि दोह्यांत भूषणास प्रश्न केला. औरंगजेबानें त्या भाटास केलेली खूण व त्यावरून भाटानें केलेला प्रश्न यावरून भूषणकवींनीं शहाचें इंगित ओळखून—

( सवाई )

केतिक देस दल्यो दलके बल, दच्छिन चंगुल चापि कै चाख्यो !
रूप गुमान हर्‌यो गुजरातको, सूरति को रस चूसि कै नाख्यो !

गंजन पेलि मलिच्छ मले सब, सोई बचे जेहि दीन ह्वै भाख्यो।
सो रंग है शिवराज बली, जेहि नौरंग में रंग एक न राख्यो !

या कवितेंत उत्तर दिलें कीं, “ ज्यानीं कित्येक देश आपल्या सैन्य-बलानें जिंकले, दक्षिणेला तर हाताच्या चगुलानें दाबून तिचा रस चाखला, गुजराथेचें सौंदर्य व मान हरण केला, सुरतेचा रस शोषून तिला टाकून दिली, सर्व म्लेंच्छ पजानें मळून टाकले, शेवटीं जे शरण आले तेच मात्र वांचले. अशा छत्रपती शिवाजी महाराजात इतका शौर्यरंग भरला आहे कीं, त्यानीं नौरंगशहात एकही रंग राखला नाहीं ! ”

या उत्तरानें औरंगजेबावर कोणता परिणाम होईल, हें भूषणानीं अगोदरच जाणून कविता संपताच त्यानीं घोडीला टाच मारिली व तीही बिजलीसारखी चमकत उडाली !

भूषणाच्या मागील दोन कवितांनीं घायाळ झालेल्या औरंगजेबाचे घाव नमाज आदिकरून ईश्वरप्रार्थनांनीं यद्यपि बुझालेले होते, तरी या नवीन विषारी बाणानें त्याचें शरीर विषमय होऊन तो अगदीं विक्षिप्त झाला. शिवाजीसारख्या महाशत्रूची बढाई व आपली नालस्ती एकाच वेळीं ऐकून तो आपादमस्तक जळून गेला! त्याला वाटू लागलें कीं, सर्वांची भीड बाजूस सारून त्या सभेतच मी भूषणास का छाटून टाकिलें नाहीं ?

औरंगजेबास शिवाजीमहाराजाचा पराक्रम ठाऊक होता. ज्या दिवशीं त्यानें छत्रपतींचा दिल्लीदरबारात अपमान केला, त्यावेळीं क्रोधानें संतप्त झालेली ती पराक्रमाची मूर्ती त्याच्या नेत्रांसमोर होती. तो जाणत होता कीं, ज्याने विजापूरसारख्या पातशाहीस जर्जर केलें व माझ्या काळ-जाला हृद्रोग लाविला, त्या बजरंगबली शिवाजीच्या शौर्यगुणास जर भूष-णासारखा वीररसाची कविता करणारा कवी मिळाला, तर त्याच्या विक्रम-वन्हीनें माझ्या रौप्य सिंहासनाचें तेज मलीन होऊन जाईल.

प्राप्तस्थिति, विपच्छंका व प्रकटक्रोध यांनीं कंपायमान झालेल्या जिव्हेनें त्यानें हुकूम केला कीं, ' जो कोणी भूषणास मारून टाकील, अथवा जिवन्त पकडून आणील, त्याला १० गांवें इनाम मिळतील ! ' समीपस्थ लोकांतून कांहीं लोक घोड्यावर स्वार होऊन जहागिरदार व इनामदार होण्याच्या इच्छेनें एका महाकवीस ठार मारण्याकरितां अथवा जिवन्त पकडण्याकरितां त्याच्या पाठीस धावले ! !

त्या तेजस्वी कवीची तेजस्वी घोडी कोठें आणि या हांजीखोराचे मिजासखोर घोडे कोठें ? तिला कोठलें गाठायला ! ती वेगवान् घोडी वाऱ्याबरोबर उडत चालली होती आणि हे पाठीमागून मृगतृष्णेंत भूषणाला धरण्याची कामना करणारे दुष्ट रायफल बंदुकीच्या एका टप्प्यात धूळ फाकीत होते ! याप्रमाणें पाठलाग होतां होतां भूषण व त्याची केसर गर्द झाडीच्या गिरिगव्हरात त्यांच्या दृष्टीपुढें चमकून अदृश्य झाली.

सुतानें मत्त मातंगाला बांधण्याची इच्छा करणारे जसे उपहास्य होतात, आरक्तवर्णा पतिप्राणा पतिव्रता सुंदरीच्या सुयौवन लावण्यजालांत फसून जसा कुटिल लंपट हताश होतो, त्याचप्रमाणें उज्वल षोडशकला कलित–कलाधरावर धूळ टाकणारें बालक जसें स्वाननाला मलीन करून घेतें, त्याप्रमाणें शहाचे मनस्वी अनुचर कामनाहीन असे परत आले. औरंगजेबानें सर्वांच्या तोंडावर निष्फलतेची छाया पाहून, एक निःश्वास सोडिला आणि म्हटलें—' क्या पाजी भाग गया ? '

संपत्तीनें धुंद बनलेल्या, खोट्या मानास लालचावलेल्या व अनीतीच्या पंकिलात सदैव रमणाऱ्या पामराचे राष्ट्रास ललामभूत अशा गुणी जनाविषयींचे दुष्ट प्रलाप त्यांच्या मागें देखील रसिकास ताप देतात. वरील उद्गार त्याचप्रकारचा आहे. आपल्या वीररसाच्या कवितेनें देश भक्तांच्या बाहूत शौर्य भरणारा, खुंटीवरच्या तरवारी हातीं चढवून देणारा आणि सज्ज झालेल्या समरधुरंधराच्या पलटणी शत्रूच्या अभेद्य तटावर

आदळून सोडणारा कविराज भूषण काय पाजी ! परमेश्वरानें दिलेल्या वाणीचा हा केवळ दुरुपयोग होय.

औरंगजेबाच्या स्वाराना मागें टाकून भूषणकवि अमरकंटकोच्या कंटकमय मार्गांतून, विंध्याचलाच्या निबिडारण्यातून व सातपुड्याच्या एकेका पुडातून बाहेर पडत सह्याद्रीच्या तळवटात येऊन पोहोंचले. शहाच्या मर्मभेदक उन्मत्त शब्दांनीं झालेला कवीचा जळजळाट नर्मदेच्या खळखळाटानें थोडा कमी झाला. तापीच्या शांत प्रवाहानें त्यांच्या मनाचा ताप कांहींसा विझाला. दुःखाला खडकावर टाकीत, कष्टाला गिरिगुहेंत सोडीत, गड, दुर्ग, किल्ले, घाट यांना ओलांडून त्यानें श्रीछत्रपतींची गादी जो रायगड किल्ला तो जवळ केला !

तेथें भव्य शिलातलावरून स्वच्छंद वाहणारे जलौघ, प्रवाहाच्या योगानें एका जलौघाचा दुसऱ्याशीं संयोग, त्यांच्या जलदर्पणांत विलसणाऱ्या हरित वृक्षांच्या छायेचें प्रतिबिंब पाहून कवीचें मन आनंदित झालें. येथें कांहीं वेळ विश्रांती घ्यावी असें त्यास वाटलें व तो त्या निसर्गरम्य स्थानावर इकडून तिकडे फिरू लागला. फिरता फिरता एकदम थबकून पहातो, तों कांहीं अंतरावर कोणी घोडेस्वार लांब पल्ल्यावरून कुठूनसा दौड करून आल्यामुळें आपल्या वेगवान् घोड्याच्या अंगांतील फुरफुरी हलु हलू कमी करण्याकरितां त्यास इकडून तिकडे फिरवीत आहे ! त्याच्या तेजस्वी मुखमंडलावरील घर्मबिंदु आणि घोड्याचें घामानें थबथबलेलें अंग यावरून त्याच्या मार्गश्रमाची कल्पना करितां येत होती. घोड्याच्या नाकपुड्या सारख्या खालवर होतच होत्या. घोड्याच्या पुठ्यावर थाप देणें, त्याला चुचकारणें, यावरून तो स्वार आता खालीं उतरणार, असें वाटलें. त्या पुरुषाचें उन्नत ललाट, विशाल भुजा आणि उद्यतानन, यावरून हा कोणी भाग्यवान् पुरुष असावा असा तर्क होई. त्या तेजस्वी महोदयाच्या मुखावरील शुभ्र उज्ज्वल प्रभा आणि दोन्ही भ्रुकुटींच्यामध्यें देवीभक्ताचें

आरक्त चिन्ह पाहून भूषणजीस वाटलें, कीं हा कोणी हिंदू असावा. डोक्यावर बहुमोल भूषण, गळ्यात हिऱ्यामोत्याच्या गंगायमुनेप्रमाणे मालिका यांनीं प्रेक्षकनेत्र समाधान पावत होते. अंगरख्याच्या आतील फणाकार हात व त्यावरील सुवर्णाची पहुंची पाहणाराचें लक्ष वेधून घेत होती. त्या ऐश्वर्यशाली श्रीमंत पुरुषाच्या डाव्या हातात प्राचीन शिल्पकारानीं केलेली झकाझोक बाकदार तरवार पाहून आपल्या वंशाला इतिहासांत चिरंजीव करणारा हा कोणी असामान्य शूर आहे असें वाटे ! भूषण कवींनीं आर्यनीतीला अनुसरून सभ्यतापूर्वक त्यास प्रणाम केला. त्या तेजस्वी पुरुषानेंही तसाच प्रणाम करून विचारिलें, " आपण कोण आहात ? "

" मी अंतर्वेदींत राहणारा कान्यकुब्ज ब्राम्हण आहें. माझें नाव कविभूषण, पित्याचें नांव रत्नाकर. " भूषण कवींनीं उत्तर दिले.

" आपण कोठून येत आहा ? " त्या तेजस्वी पुरुषानें विचारलें.

" मी दिल्लीच्या दरबारीं शहा औरंगजेब याच्या जवळ होतों. एके दिवशीं त्याच्या आज्ञेनुसार मी त्याचें सत्कीर्तन केलें, तो मजविषयीं विरक्त व क्रोधिष्ट झाला, तेव्हा मी इकडची वाट धरली. " भूषणजी म्हणाले

" आपण आता कोठें जावयाचें ठरविलें आहे ? " त्या महोदयानें पुसिलें.

" मी आता हिंदुधर्माचें संरक्षण करणारे आणि हिंददेशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे महाराज शिवाजीराजे भोसले याच्या दरबारीं जाणार आहें. "

" जर आपण कवि असून त्यांच्या दरबारीं जाण्याची इच्छा करिता तर मग त्याच्यावर आपण कांहीं कविताही केली असेल ! तर मला ती आपण म्हणून दाखविता का ? "

" आपले तर बरेच प्रश्न झाले व त्यांचीं मी नम्रतेनें उत्तरेंही दिलीं. आता एक वेळ माझ्या प्रश्नाचें उत्तर देण्याची कृपा कराल, तर मी श्रीशिवाजी राजाचें कीर्तिकाव्य आपणास म्हणून दाखवितों."

" आपण विचारावें; मी प्रसन्नतेनें उत्तर देईन."

" आपण कोण आहां ? शिवाजी महाराजाच्या दरबारांत कोणत्या अधिकारावर आहां ? अथवा त्यांच्याशीं आपला काय संबंध आहे ? " त्या तेजस्वी पुरुषानें उत्तर दिलें कीं—

" मी शिवछत्रपतींचा सेनापती आहें. राजनीतिप्रमाणें मी शिवाजी महाराजांचें षष्ठांग आहें. मला कविता ऐकण्याची आवड आहे आणि विशेषेंकरून माझ्या स्वामीसंबधीं कविता तर मला फार आवडते."

" सेनापतीसाहेब ! आपल्यासारखे समरवीर जर माझी कविता ऐकूं इच्छितात, तर माझेही परिश्रम सफल होतील, असें मला वाटतें. ठीक आहे, तुमच्या स्वामीवरची कविता ऐकावी."

असें म्हणून सत्कवि भूषणजींनीं पुढील कविता म्हटली—

इंद्र जिमि जंभपर, वाडव सुअंभपर, रावण सदंभपर रघुकुलराज है
पौन वारिवाहपर, संभु रतिनाहपर, ज्यौं सहस्रबाहपर राम द्विजराज है
दावा द्रुमदंडपर, चीता मृगझुंडपर, भूषण वितुंडपर जैसे मृगराज है
तेज तम अंसपर, कान्ह जिमि कंसपर, त्यौं म्लेंच्छवंशपर शेर शिवराज है

हिंदी भाषा आधींच मर्दानी ! तींतील ती वीररसाची अलंकारिक कविता आणि प्रत्यक्ष कवीच्या तोंडून ऐकावयास मिळाली ! हिंदसरस्वती-कंठाभरण भूषणानीं ती अशा गर्जनेनें आणि हावभावानें म्हटली कीं, ऐकणारा तेजस्वी पुरुष जरी मार्गश्रमानें शिथिलतनु झाला होता, तरी तो वीरश्रीच्या आवेशांत रोमांचित झाला ! नजर फिरून गेली व बाहू फुरफुरूं लागले ! पुन्हा तीच कविता म्हणण्याविषयीं त्यानें कवीस विनंती केली !

कवीनें पुन्हां त्याच आवेशात व त्याच जोमांत कविता म्हटली! तेजस्वी पुरुषाची अभिलाषा पुन्हां वाढली आणि त्यानें कवीला पुन्हां खूण केली! कवीनेंही ती कविता पुन्हां म्हटली! याप्रमाणें जों जों त्या वीरपुरुषाचा उत्साह व कविता ऐकण्याची लालसा वाढत गेली, तों तों भूषणजीही कविता म्हणतच गेले!

याप्रमाणें भूषणकवींनीं * १८ वेळा कविता म्हटल्यावर ते शिथिल झाले व त्यांचा गळा बसून गेला. शेवटीं—" आतां क्षमा करा! माझ्या कंठनलिका फुगून गेल्या," अशी त्यांनीं त्यास विनती केली. गडाखालील देवडीवर त्या कविभूषणाची सर्व व्यवस्था लावून जातां जातां त्या वीर-रत्नानें सांगितलें कीं, " आपण मला शिवाजीमहाराजाची कीर्ति ऐकविली, यामुळें मी आपला फार आभारी आहें. आपली त्यांची दरबारात भेट घडवून आणण्यात मी आपला साह्यकारी होईन " असें म्हणून तो महापुरुष घोड्यावर बसून निघून गेला.

दुसरे दिवशीं अखण्डप्रतापी भोसलेकुलविभूषण शिवाजीमहाराजां-च्या दरबारात भूषणकवींचा प्रवेश झाला. रायगडावरची त्यांची गादी कांहीं प्राचीन तर नव्हती; पण त्यांचा तो प्राचीन राज्यनीत्यनुसार शोभि-

---

* कोणी म्हणतात १८ वेळा नव्हे ५२ वेळा भिन्न भिन्न कविता म्हटल्या व त्याच कविता ' शिवाबावनी ' या नांवानें प्रसिद्ध झाल्या. ही गोष्ट जशी अशक्य वाटते, तशीच वरील एकच कविता ५२ वेळा म्हटली गेली ही दुसरीही दंतकथा असंभवनीय वाटते. मात्र छत्रपतींकडून मिळा-लेल्या विपुल देणगीचें वर्णन स्वतः भूषणकवींनीं आपल्या शिवराजभूषण-ग्रंथांत १४०. १७१, १७५, २१५, २२१, २८०, २८३ ३२६, ३३६, ३४० इत्यादि कवितांत केलें आहे; तें उपर्युक्त दानाची सत्यता दाखवितें. शिवाय त्या वेळच्या इतर हिंदी कवींनींही लिहून ठेविलें आहे कीं, कवितेवर भूषणजीइतकी संपत्ती कोणीही मिळविली नाहीं.

पंत राजदरबार पाहून भूषणजी प्रसन्न झाले आणि आपल्या पूर्वपरिचित सेनापतीला शोधकदृष्टीनें पाहूं लागले, तो कोठें दिसेना.

सभेंत उच्च सुवर्णसिंहासनावर एक तेजस्वी विशालशीर्षाचा पुरुष राजपरिवेषानें विभूषित असा बसलेला पाहून तेच शिवछत्रपति असावे, असें जाणून भूषणजींनीं त्यास सविनय नमन केलें आणि काल म्हटलेली कविता त्याच आविर्भावांत म्हटली. त्याबरोबर वीर पुरुषांनीं गजबजलेली ती सर्व सभा तर रोमांचित झालीच; पण शिवप्रभूंजवळ बसलेले एवढे विरक्त श्रीसमर्थ रामदासस्वामी त्यांचीही मान डोलावयास लागली आणि त्यांचीही दृष्टि आकर्षिली *गेली! धन्य तो कवि आणि धन्य ती राजसभा! कविता समाप्त झाल्यावर एका सरदारानें उठून कविराज भूषणजीस योग्य स्थान दाखविलें आणि व त्यावर विराजित होण्याची संज्ञा केली.

भूषणानीं निरखून पाहिलें, तों काल आपण ज्यास १८ वेळा कविता म्हणून दाखविली, तोच राजपुरुष सिंहासनावर बसलेला आहे असें त्यांस आढळून आलें! तेव्हा त्यास फार आश्चर्य वाटलें. प्रत्यक्ष शिवछत्रपतींशीं आपण अधिक सलगीनें वागलों, म्हणून त्यास कांहींसा खेद वाटला. परंतु पुनः त्यांस समाधान वाटलें कीं, एकंदरींत काल आपणाकडून अमर्याद अथवा अनुचित प्रकार घडला नाहीं.

तीक्ष्णबुद्धीच्या शिवरायानीं भूषणजींच्या मुखावरून त्यांचे अतस्थ विचार ओळखले आणि म्हटलें—" मतिमान्! कवि भूषणजी! आतां म्लेंछ कुलांगाराची कांहीं भीती न धरितां इथें निःशंक राहून माझ्या सभेची शोभा वृद्धिंगत करा. आम्हाला तुमच्यासारख्या वीररसोद्दीपक काव्यशक्तिशाली पुरुषाची फार आवश्यकता होती. कामनादायिनी त्रिपुरसुंदरी

---

* दोहा—भव्य सभा शिवराजकी, रामदास गुरुराय ।
डोलै यश बरनत करत, सो भूषण कविराय ॥ १ ॥

भगवतीनें आज ती पूर्ण केली. आतां आपण संकोच व शंका धरूं नये. म्लेंच्छ दरबार व तिकडील हकिकत याचें वर्णन करा. ”

महाराजांच्या आश्रयदायी अभयवाणीनें निर्भय होऊन कवीनें—

१ जोरि करि जैहैं जु मलाहके नरेशपर इ०

२ डाढीके रखैयनकी डाढीसी रहति छाति इ०

३ उतरि पलग ते न दियोहै धरा पै पग इ०

हे तीन* कवित्त म्हटले. ते ऐकतांच शिवरायांचा दरबार वीरश्रीनें गर्जून उठला! त्या प्रसन्नतेच्या व आनंदाच्या भरांत शिवराज अधीरतेनें म्हणाले, “ कविराज भूषण! काल आम्ही प्रतिज्ञा केली होती कीं, आपण जितके वेळा कविता म्हणाल तितके लक्ष रुपये, तितके हत्ती व तितके गाव आपणास इनाम द्यावयाचे! त्याप्रमाणें आपणास १८ लक्ष रुपये, १८ हत्ती व १८ गांवें दिलीं आहेत[1]. पोषाखासह तीं आतांच आपणास मिळतील. आजपासून आपणास या दरबारांतील राजकवीचें पद दिलें जात आहे. ”

भूषणजींनीं नम्रतापूर्वक उठून सांगितलें कीं—

“ ऐश्वर्यवान् महाराजन्! मै गांव, हाथी और वस्त्रके लिये यहांपर नहीं आया; किन्तु मुझे आपका शौर्य तथा आर्याभिमान सुनकर आपके आश्रित होनेकी अभिलाषा हुई। आपके शूर योद्धाओंके हाथसे शत्रुओंका नाश और संहार तथा भरतके स्वातन्त्र्यको देखनेकी मुझे वासना है। स्वदेशाभिमान दर्शनसे विशेषमान्य पुरस्कार मेरी आँखोमे दुसरा नहीं आता!”

कमाऊनच्या राजानें गर्वोक्तिपूर्वक दिलेले लाख रुपये तृणासमान मानणाऱ्या या कवीला भारताचें पारतन्त्र्य पाहून आदरानें दिलेलें एवढें

---

* या पुस्तकांतील कविता नं० २२-३० व २६ पहा.

१ संवत १७६० ( सन १७०३ ) मधील लोकनाथ कवि भूषणजींना छत्रपतींकडून ५२ हत्ती मिळाल्याचा उल्लेख करितात, यावरून द्रव्यही विपुल मिळालें असावें.

द्रव्य तुच्छ वाटावें ही केवढी विस्मित करणारी गोष्ट आहे ! भूषणजींची ही देशभक्ति पाहून महाराजांना अधिकच आनंद झाला व त्यांनीं त्यांचा चांगलाच पुरस्कार केला. आपल्या येथें त्यास ठेवून घेऊन त्यांची त्यांनीं उत्तम व्यवस्था ठेविली. अखडयशधारी, कीर्तिमहत्त्वभाजन व औरंकुम्भे-जागर शिवाजी महाराजांचे ते राजकवि झाले. हा सुंदर राजकविसमागम इ० स० १६६७ त झाल्यावर तेव्हांपासून त्यांनीं शिवराजभूषण ग्रंथ लिहावयास आरंभ केला व तो इ० स० १६७३ त संपविला. 'शिवा-बावनी' त्यानंतर पूर्ण केली, असें तज्ज्ञांचें मत आहे. राजकवींचें महत्पद व त्याचें सुख भोगून कांहीं वर्षांनीं भूषणजीस घरीं जाण्याची इच्छा झाली. दानमानानें युक्त होऊन पुन्हां परत येण्याविषयीं छत्रपतींची आज्ञा मान्य करून त्यांनीं शिवप्रभूचा निरोप घेतला.

येतांना मार्गांत पन्ना संस्थानचे राजे छत्रसालजी यांनीं भूषणजींची कीर्ति ऐकून त्यांची भेट घेतली. याविषयीं अत्यंत आश्चर्याची गोष्ट पंडित मिश्रबंधूंनीं ही लिहिली आहे कीं, छत्रसाल राजास वाटलें, कमाऊन, दिल्ली, रायगड येथील नरेशापुढें मानसन्मान पावलेले श्रेष्ठ कवि कुठें आणि मी कुठें ? ह्यां कोणत्या प्रकारचा सन्मान करून त्यास तुष्टवावें ? असा विचार करून कविराज भूषणजी ज्या पालखींतून जात होते, त्या पालखीच्या वाहकांत मिसळून त्यांनीं आपल्या स्कंधावर तो आंदोलिका दंड ठेवून घेतला ! ! ! अहाहा ! भूषणांनीं तो रायाचा सत्कार पाहतांच 'हाँ ! हाँ ! महाराज !' म्हणून एकदम पालखीखालीं उडी घेतली ! आणि तात्काल त्यांच्या प्रशंसापर २-३ कविता म्हटल्या. त्या 'छत्रसालदशक' नांवाच्या त्यांच्या काव्यात समाविष्ट आहेत. स्थलाभावीं आम्हास त्या देतां येत नाहींत.

जेव्हां भूषणजी आपल्या घरीं पोंचले, तेव्हां मोठा आनंद मानिला

---

. . १ घरीं जाण्यापूर्वीं त्यांनीं कोंकणातील एक लाख रुपयाचें मीठ विकत घेऊन तें घरीं आपल्या भावजईकडे पाठवून दिलें होतें, म्हणतात !

गेला. कोमानें लुटलेले व फुटलेले शत्रूही मित्र होऊन ते त्या आनंदात मिळाले. ही वार्ता हळू हळू दिल्लीपर्यंत पोंचली !

शहाजहानानंतर भूषणकवींचे बंधु चिंतामणी हे दिल्लीदरबारांतच होते. बादशहा औरंगजेबाने चिन्तामणीकडून एकदा दरबारांत येण्याविषयीं त्यांचें मन वळविलें. चिन्तामणींनीं शहाच्या आज्ञेवरून आपल्या धाकट्या बंधूस दरबारात चालण्याविषयीं आग्रह केला. प्रथम त्यांनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं. शेवटीं ज्येष्ठ बंधूचा अत्याग्रह पाहून त्यानीं त्यास सांगितलें, " ऐका, आम्ही बादशहाचे कट्टे वैरी, तसेंच शिवाजी महाराजांचे प्रशंसक आहोंत. जर आमच्याकडून शिवप्रभूची स्तुति ऐकावयाची असल, तर आम्हा दरबारात येऊ शकतों ! "

चिन्तामणींनीं औरंगजेबास बंधूची ही अट कळविली. त्यानें ती मान्य केल्यावर मग ते दरबारीं गेले. * बादशहानें जेव्हां त्यास म्हटलें कीं, ' तुमची शौर्यशालिनी कविता म्हणून दाखवा. ' तेव्हा त्यानीं उत्तर दिलें— " आपण प्रथम आपले हात व कान धुवून टाका. मग माझी कविता ऐका ! " शहानें कारण विचारिता त्यानीं सांगितलें—" माझे सहोदर चिन्तामणी हे आपणास नित्य शृंगारिक कविता ऐकवितात व त्यामुळें आपले हात परवश होतात ! पण माझी कविता ऐकून आपला हात मिशीवर जाईल ! "

बादशहा म्हणाला, " ठीक ! मी हात तर धुतों; पण जर माझा हात मिशीवर गेला नाहीं, तर भ्रष्टप्रतिज्ञ कवीचें मी डोकें कापून घेईन. "

बादशहानें हात धुतले आणि कवीश्वर भूषणजींनीं वीररसांतील कवितामृत जागविण्यास प्रारंभ केला. त्यांतील शिवछत्रपतींचें यशोवर्णन त्यास असह्य झालें; तेव्हां त्यानें आज्ञा केली कीं, " मी सार्वभौम राजा

---

* चिटणीस बखरींत औरंगजेब व भूषणकवी यांच्या या भेटीचा उल्लेख आहे.

आहे; सर्व राजे मला कर देतात. शिवाजी हा एक लहान मांडलिक राजा आहे. त्याचें यश मांडलिक भूपालात वर्णन करा."

भूषणकवींनीं आपल्या तिर्यक्‌विससर्पिदृष्टीने शहाकडे पाहून व किंचित् मान हालवून लागलींच कवितेत वर्णन केले कीं, "सर्व राजे पुष्प-वृक्ष आहेत व बादशहा हे मकरंद सेवन करणारे भ्रमर आहेत; परंतु शिव-भूप त्या पुष्पवृक्षातील चंपक आहेत. चंपकाजवळ भ्रमर जाऊं शकत नाहीं!"

"अली नौरंगजेब चंपा शिवराज है" (कविता न० ३८।३९पहा )

कवी तो कवीच. दुर्वर्तनी भूपती 'आपण लक्ष्मिपती आहोंत' म्हणून मानधनाचेही पती होऊं इच्छित असतील; पण खरे कवी त्यांची यथार्थ योग्यता जगाला दाखवायला थोडेच भिणार? औरंगजेबास त्या कवींद्राचें वर्णनचातुर्य पाहून आपल्या उद्भ्रांत मनाचें संयमन करावें लागलें. शहा पुढें म्हणाला, 'बरें हें असो; पण ज्याकरितां माझे हात धुवविले, ती आपली प्रतिज्ञा पूर्ण करा!'

हें ऐकतांच भूषणकवीश्वराची वीररसाची रसवती वाहू लागली. सभेत बसलेले रजपूत, राव, ठाकूर व अमीर-उमराव यांच्या नजरा फिरूं लागल्या, बाहू स्फुरण पावूं लागले! त्या हिंदीसाहित्यकोविदाच्या प्रत्येक शब्दानें, प्रत्येक ओळीनें रसविज्ञांच्या व विक्रमी पुरुषाच्या भावना प्रदीप्त झाल्या! सर्व दरबार भूषणकवीकडे विस्फारित नयनांनीं पहात होता आणि रोमांचित होत होता. स्वतः कवि तर अंगविक्षेपांत बेभान झाला होता. पहिली कविता संपली, दुसरीला आरंभ झाला. तीही संपून तिसरी, चौथी शेवटाला पोंचते, तों त्या कवितांचा बादशहावर परिणाम झालेला दिसला. त्याच्या भुवया वर चढल्या, मान फिरू लागली. सातवी कविता पूर्ण होतांच बादशहाचा हात अवसानासरसा नकळत मिशीवर चढून गेला! अहाहा! धन्य तो कवी! या सात कवितांपैकीं एखादी जरी उपलब्ध

असती, तरी ती आम्ही वाचकांकरितां अवश्य दिली असती. भूषणकवींचे बरेच काव्यग्रंथ अजून उपलब्ध व्हावयाचे आहेत. त्यांत जर या कविता मिळाल्या, तर तो एक अमूल्य ठेवा सांपडल्यासारखें होईल. हल्लीं जे * चार ग्रंथ उपलब्ध आहेत, ( शिवराजभूषण, शिवाबावनी, छत्रसालदशक व स्फुटसंग्रह ) त्यांतील कविता देखील जणों काय वीररसाचे प्यालेच भरून ठेविले आहेत, असें वाटतें. एकट्या शिवराजभूषणकाव्यांत ३८२ वीरसाच्या उत्तमोत्तम अलंकारिक कविता आहेत.

त्या सत्यप्रतिज्ञ कवीवर बादशहा फार प्रसन्न झाला आणि त्यानें त्याचा बहुत सन्मान करून बहुमोल पारितोषिक दिलें. ही हकिकत दक्षिणेंत छत्रपती महाराजास कळताच त्यानीं त्यास राजपत्रिका पाठवून बोलावून घेतलें. भूषणकवींनींही वीररसाच्या उल्हासात व राजाश्रयाच्या सुखात अजरामर कीर्ति मिळविली. ते इ० स० १७१५ च्या सुमारास १०२ वर्षांचे होऊन परलोकवासी झाले. छत्रपती संभाजी महाराज व शाहू महाराज यांच्याही दरबारीं ते आले होते व त्यांवरीलही त्यांच्या कांहीं कविता उपलब्ध आहेत. तिकवांपुरात तसेंच मध्यप्रांतांत अजूनही भूषणकवींचे वंशज आहेत, असें म्हणतात.

—:×—

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ३६२६

* बनारसच्या नागरीप्रचारिणी सभेकडे ‘ भूषणग्रंथावली ’ नावानें हे चारी ग्रंथ विकत मिळतात.

# शिवप्रताप-काव्य



[ कविराज भूषणकृत शिवाबावनीचें मराठी रूपांतर ]

# शिवाबावनी

( हिंदी मूळ )

छप्पय अथवा षट्पद

१

जै जयति जै आदिशक्ति जै कालि कपर्दिनि ।
जै मधुकैटभ-छलनि देवि जै महिष-विमर्दिनि ॥
जै चमुंड जै चंडमुंड-भंडासुर-खंडिनि ।
जै सुरक्त जै रक्तबीज बिड्डालै-बिहंडिनि ॥
जै जै निसुंभ-सुंभद्दलनि भनि भूषन जै जै भननि ।
सरजा समर्थ शिवराज कहँ देहि बिजय जै जग-जननि ॥

२

बिजपूर बिदनूर सूर सर धनुष न सधहि ।
मंगल बिनु मल्लारि नारि धम्मिल्ल न बंधहि ॥
गिरत गब्भ कोटै गरब्भ चिंजी चिंजा डर ।
चालकुंड दलकुंड गोलकुंडा संका उर ॥
भूषन प्रताप शिवराज तव इमि दच्छिन दिशि संचरहि ।
मदुराधरेस धकधकत सो द्रविड निबिड डर दबि डरहि ॥

---

१ या छंदांत सहा चरण असतात. पहिले चार चरण 'काव्यछंद' नांवाचे असतात व शेवटचे दोन 'उल्लाला' नांवाचे असतात. काव्यछंदाचा प्रत्येक चरण २४ मात्रांचा असतो व त्यात ११ व्या मात्रेवर यति असतो. उल्लाला नांवाचे चरण प्रत्येकीं २८ मात्रांचे असतात व त्यांत १५ व्या मात्रेवर यति असतो.

२ बिडालाची कथा दुर्गापुराणात आहे व भंडासुराची उपपुराणांत आहे.

# शिवप्रताप-काव्य

## ( हिन्दी शिवाबावनीचें मराठी रूपांतर )

मन्दारमाला–वृत्त

१

देवी ! उमे ! कालिके ! आदिशक्ती ! शिवानंदिनी भक्तकल्याणिनी !
चंडासुरच्छेदिनी ! भद्रकाली ! निशुंभासुर–प्राणसंहारिणी !
दाक्षायणी ! शैलराजेंद्रकन्ये ! जगत्स्वामिनी ! राजराजेश्वरी !
कुळाची भवानी तुला प्रार्थितो हा शिवाजी, रणीं दे जय स्वामिनी !

२

गेलें विजापूरचें तेज गेलें, धनुष्येंहि बिदनूरचीं राहिलीं ![1]
मल्लार–वेण्या[2] विमुक्ता जहाल्या, जहाल्या विचूर्णाहि दुर्गावली !
संचारतां दक्षिणेच्या दिशेला महाराष्ट्र–राजेश्वरा ! तूं यदा–
फोंड्यांत[3] कोंड्यांत[4] जिंजींत झाली तुझी शूरता धीरता कंपदा !

---

१ बेदनूरच्या विधवा राणीनें शिवाजी महाराजांची मदत मागितली होती; व त्यांनीं स्वत: तेथें जाऊन तिच्या उद्दाम सरदारांस दंडिलें होतें.

२ मलबारवासी स्त्रियांच्या वेण्या.

३ फोंडा–गोवा.

४ गोवळकोंडा.

## कवित्त शुद्धघनाक्षरी अथवा मनहरन

३.

प्रेतनी पिशाचऽरु निशाचर निशाचरिहु, मिलि मिलि आपुस में गावत बधाई है
भैरों भूतप्रेत भूरि भूधर भयंकरसे, जुत्थ जुत्थ जोगिनी जमाति जुरि आई है
किलकि किलकि कै कुतूहल करति काली, डिमक डिमक डमरू शंकर बजाई है
शिवा पूँछै शिवसों समाज आजि कहाँ चली, काहू पै शिवा नरेंद्र भृकुटी चढाई है

४

बाजि बंब चढयो साजि बाजि जब कलाभूप, गाजी महाराज राजी भूषन बखानते
चंडीकी सहाय माहि मंडी तेजताई ऐंड, छडी राय राजा जिन दंडि औनि आनते
मंदीभूत रवि रजबंदीभूत हठधर, नंदी भूतपति भो अनंदी अनुमानते
रंकीभूत दुवन करंकीभुत दिगदती, पंकीभूत समुद सुलकीके पयानते

५

बाने फहराने घहराने घटा गजनके, नाहीं ठहराने राव राने देश देशके
पुर बहिराने अरि नगन पराने सुनि, बाजत निशाने शिवराज जू नरेशके
हाथिनके हौदा उकसाने कुंभ कुंजरके, भौनके भजाने अलि छूटे लट केशके
दलके दरारे हुते कमठ करारे फूटे, केरा कैसे पात बिहराने शिर शेशके

६

साजि चतुरंग वीर रंगमैं तुरंग चढि, सरजा शिवाजी जग जीतन चलत है
भुषन भनत नाद बिहद नगारनके, नदि नद मद गब्बरनके रलत है
ऐल फैल खैल भैल खलकमें गैल गैल, गजन की ठेल पेल शैल उसलत है
तारासों तरनि धुरि-धारा में लगत जिमि, थारापर पारा पारावार यों हलत है

---

१ यांत ३१ वर्ण असतात. लघुगुरूचा कांहीही क्रम नसतो. शेवटचा वर्ण मात्र गुरु असतो. १६ व्या वर्णावर यति असतो. मराठी घनाक्षरीहून याची म्हणण्याची पद्धति अगदीं निराळी आहे.

३

नक्तंचर प्रेतभक्षी भुतें तीं, तशा योगिनीही मिळाल्या सुखें !
ठाके पुढें भैरव प्रेतहारी, करी कालिका घोष भारी मुखें !
वाजे मुदें डंबरू शंभुहस्तीं, असा चालला संघ कोठें तरी ?
गौरी पुसे भव्य गौरीहराला, " शिव-भ्रू चढे आज कोणावरी ? "

४

' धूं धूं ' अशा गर्जल्या युद्ध-भेरी, चढे सज्ज वाजीवरी जैं बली-
गाजीस राजी कवी तैं स्तवाया, जया चंडिका साह्य भूमंडळीं !
जे दंडिले राव राणे पळाले, रजोमंद चंडांशु झाले गिरी !
दंती करंकी, अरी होत रंकी, पयोधीहि पंकी सुलंकेवरी !

५

भेरी नगारे शिवाचे श्रवोनी स्थळीं राहिले राव राणे न ते
मार्गीं पुरें नाद-पूरीं बुडालीं, पळाले विपक्षी विवस्त्रीच ते !
हौदे हलूं लागले, दान-धारा गजांच्या गळूं लागल्या मस्तकीं !
सैन्यें फुटे पाठ कीं कच्छपाची, फणीची फणा फाटते काय कीं ?

६

चौरंग सेना सजे युद्धरंगीं, तुरंगीं चढे भोसला मर्द तो !
ऐकून तद्वाद्य--घोषास, शीर्षीं प्रमत्त द्विपांचा मद स्रावतो !
चित्कार हुंकार सर्वत्र होई, नव्हे सैन्य वाटे उफाळे गिरी !
धूळींत नक्षत्र--सा सूर्य भासे, रसाचा जणो बिंदु पात्रावरी !

७

बाजी गजराज शिवराज सैन साजतहि, दिल्ली दलगाहि दिशा दीरघ दुबनकी
तनियाँ न तिलक सुथनियाँ न रहि अंग, घामै घबराने छोंडि सेजिया सुखनकी
भूषन भनत पतिबाँह बहियाँ न तेऊ, छहियाँ छबिली ताकि रहियाँ रुखनकी
गालिया शिथिल भई, बालियां बिथरि गई, लालियां उतरि मुगलानिता मुखनकी

८

ज्या दिन चढत दल साजि अवधूतसिंह, तादिन दिगंत लौं दुबन दाटियतु है
प्रले कैसे घाराघर धमकै नगारा धुरि-धारा ते समुद्रनकी घारा पाटियतु है
भुषन भनत भुवगोलको कहर तहाँ, हहरतगा जिमि गज काटियतु है
काचसे कचरजात शेशके अशेश फन, कमठकि पीठ पै पिठीसी बाँटियतु है

९

दुग्ग पर दुग्ग जीते सरजा शिवाजी गाजी, डग्ग नाचे डग्ग पर रुंड मुंड फरके
भूषन भनत बाजे जितिके नगारे भारे, सारे करनाटी भूप सिंघलको सरके
मारे सुनि सुभट पनारे वारे उदभट, तारे लगे फिरन सितारे--गढधरके
गोलकुंडा घीरनके बिजापूर बीरनके, दिल्लि उर मीरनके दाडिमसे दरके

१०

कोट गढ ढाहीयतु एकै पातसाहन के, एकै पातसाहन के देश दाहियतु है
भूषन भनत महाराज शिवराज एकै, साहिनकै सैनपर खग्ग बाहियतु है
क्यों न होहि बैरिन की बौरीसी बैर-बधु, दौरन तिहारे कहे क्यों निबाहियतु है
राबरे नगारे सुने बैरवारे नगरन, नैनवारे नदन निवारे चाहियतु है

११

मालवा उजैन भनि भूषन भेलसा ऐन, शहर सिरोंज लौं परावने परत है
गोंडवानो तिलगानो फिरगानो करनाट, रुहिलानो रुहिलन हिये हहरत है
साहिके सपूत शिवराज तेरी धाक सुनि, गढपति बीर तेऊ धीर न धरत है
बीजापुर, गोलकुंडा, आगरा दिलीके कोट, बाजे बाजे दिन दरवाजे उघरत है

७

जों साजलें मावळी सैन्य शस्त्रें, दिशा दाटल्या, दिठि ती फाटली !
स्वेदार्द्र वस्त्रें तनूचीं निघालीं, सुखाची गृहीं सेज दूरावली !
कांतांस वेढून कांता पहाती चमूला, पदें उंचवोनी क्षणी !
लाली पळे, कर्णभूषा गळे, आगळे शब्द येती न ते आननीं !

८

युद्धीं चढे ज्या दिनीं हा शिवाजी, दिगंतीं अरी जाउनी दाटले !
मेघापरी गर्जताती नगारे, दिसे अब्धि--धारा न धूळीमुळें !
भूगोल कांपे जिथें हा थरारा, तिथें कांपती शैल दंतीपरी !
फाटे फणा काच--सी भूधराची, उडे पिष्ठ कीं कूर्म--पृष्ठावरी !

९

दुर्गावरी जिंकिले दुर्ग सर्जा[२] ! रणीं रुंड मुंडावली पातल्या !
गेल्या भरोनी मशीदी सराया, कथा प्रार्थना कंपदा चालल्या !
कर्नाटकी भूप लंकातटाला पळाले नगारे तुझे ऐकुनी !
दाडिंब--सी मोगलांच्या मनाची गती जाहली फाटुनी फाटुनी !

१०

कोणा शहाचे हरी कोट किल्ले, कुणाच्या प्रदेशास जाळीतसे !
भूभार--हारी भवानी[३]-विहारी कुणाच्या शिरीं खड्ग फेरीतसे !
शत्रु--स्त्रिया कां न त्या घाबराव्या ? विनती करीती भतां शांत व्हा ?
वाद्य--ध्वनी ऐकिल्यापासुनी जे वहाती जनाश्रू तयां थांबवा ?

११

उज्जैन की भेलसा माळव्याच्या शिरोंजावरी घालवीले अरी !
गोंडाळ तेलंग कर्नाटकाच्या नृपांचीं मनें जाहलीं घाबरीं !
दुर्गेश दुर्गावरी धीर कोणी धरीना, तुझी भीति त्यां लागली !
कोण्या दिनीं मात्र होतात दारें विजापूर-आमातदाचीं खुलीं !

---

१ मोंगली स्त्रिया. २ शिवछत्रपतींचे आजे मालोजी भोसले यांस "सर जाह" हा किताब होता, त्याचा अपभ्रंश 'सर्जा' असा झाला. ३ भवानी खड्ग.

१२

फिरगाने फिकिर औ हद्द सुनि हबसाने, भूषण भनत कोऊ सोवत न घरी है
बीजापुर बिपति बिडरि सुनि भाज्यो सब, दिल्ली दरगाह बीच परी खरभरी है
राजनके राज सब साहिनके शिरताज, आज शिवराज बादशाही चित्त धरी है
बलक बुखारे कासमीर लौं परी पुकार, धाम धाम धूमधाम रूमसाम परी है

१३

बलक बुखारे मुलतान लौं हहरबारे, कंपिलौं पुकारै कोऊ धरत न सार है
रूम रूंदि डारे खुरासान खूंदि मारे, खाक खादर लौं झारे ऐसी काहुकी बहार है
कक्करलौं बक्खरलौं मक्करलौं चले जात, टक्कर लेवैय्या कोऊ वार है न पार है
भूषन सिरोंजलौं परावने परत फेरि, दिलीपर परति परिंदनकी छार है

१४

बद्दल न होहिं दल दच्छिन घमड माहि, घटा हु न होहि दल शिवाजी हकारिके
दामिनी दमक नाहिं खुले खग्ग बीरनके, बीर शिर छाप लखु तीजा असवारीके
देखि देखि मुगलांकी हरमैं मंदीर त्यागैं, उझकि उझकि उठैं गर्द बीच दारीके
दिल्ली मत भूली कहैं बात घन घोर घोर, बाजत नगारे जे सितारे-गढधारीके

१५

चकित चकत्ता चौंकि चौंकि उठे बार बार, दिल्ली दहसाति चित चाहै खरकति है
बिलखाति मुख बिलखाति बीजापूरपति, फिरत फिरगिनकी नारी फरकति है
थर थर कांपत कुतुबसाह गोलकुंडा, हहरि हबस भूप भीरैं भरकति है
राजा शिवराजके नगारनकी धाक सुनि, केते बादशाहनकी छाती दरकति है

१६

अफजलखानको जिन्होंने मयदान मारा, बीजापुर गोलकुंडा मारा जिन आज है
भूषन भनत फरासीस त्यों फिरगी मारि, हबसी तुरक डारे उलटि जहाज है
देखत मे रुसतमखाँको जिन खाक किया, सालकी सूरति आज सुनी जो अवाज है
चौंकि चौंकि चकत्ता कहत चहुँघा ते यारो, लेत रहो खबरि कहाँ लौं शिवराज है

१२

सीमेस सीमा भिडे राजयाची न सिद्दीस शाहास निद्रा असे !
दिल्लींत दर्ग्यांत या संकटाची महच्चिंतना चाललेली दिसे !
राजेश्वरा ! राजलें छत्र शीर्षी तशीं चामरें डोलली जेधवां--
काश्मीर काबूल खोकंद देशीं भयग्रस्त झाली प्रजा तेधवां !

१३

मुल्तान काबूल वेशीस गेली अवाई, धरी स्वत्व ना कोणिही
कंधारवाले खुरासानवाले ' खुदा या खुदा ! ' बोलताती गृहीं !
रेवा–तटाची खुली वाट ज्याला विरोधास येई न कोणी पुढें !
स्वारी शिरोंजास गेली शिवाची वहातात निःश्वास दिल्लीकडे !

१४

कादंबिनी ही न, ही दक्षिणेची महाशूर सेना शिवाची असे !
ही दामिनी नाहिं, खड्गावली ही, भटांच्या करीं तेज दावीतसे !
साताऱ्च्या भूपतीचे नगारे यदा वाजती युद्ध--संवेदक–
झोंपेंतुनी बावरूनी ' पळा रे पळा ! ' बोलती मोंगली नायक !

१५

चक्रापरी तोंड दिल्लीश्वराचें फिरे विस्मयें, खिन्नता पावतो !
झांकी विजापूरवाला मुखाला, किती गोळकोंडापती कांपतो !
जों वाजले दक्षिणेच्या नृपाचे नगारे रणोत्साह–संवर्धक–
'हा ! हा !' असा हब्सणीं शब्द झाला फिरंगी दडे सागरीं विन्मुख !

१६

बाहुप्रतापें रणीं अफ्जुलाला उभा फाडिला, पाडिला तो बळी !
जाणो विजापूरच्या मंदिराचा उभा पाडिला स्तंभ भूमिस्थळीं !
हब्सी फिरंगी फरासीस यांचीं जहाजें जलीं पालथीं घातलीं !
' आला शिवा कोठपर्यंत सांगा ' शहाच्या मनीं काळजी लागली !

---

१ औरंगजेबास. २ शिवाजीमहाराजास राज्याभिषेक झाला तेव्हां.

१७

जीत्यो शिवराज सलहेरिको समर सुनि, सुनि असुरन के सु सीने धरकत है
देवलोक नागलोक नरलोक गावैं जस, अजहूँ लौं परे खग दाँत खरकत है
कटक कटक काटि कीटसे उडाये केते, भूषन भनत मुख मोरे सरकत है
रनभूमि लेटे अधकाटे फरलेटे परे, रुधिर लपेटे पठनेस तरफत है

१८

उतै पातशाह जूके गजनके ठट्ट छूटे, उमडि घुमडि मतवारे घन भारे है
इतै शिवराज जूके छूटे सिंहराज कैधौं, बिदारे कुंभ करिनके चिकरत कारे है
फौजैं शेख सय्यद मुगल औ पठाननकी, मिलि इकलास काहू मीर न सम्हारे है
हद हिंदुवानकी बिहद तरवारि राखि, कैयो बार दिल्लीके गुमान झारि डारे है

१९

चंद्रावलि चूर करि जावली जपत कीन्ही, मारे सब भूप औ सहारे पुर धायकै
भूषन भनत तुरकान दलथंभ काटि, अफजल मारि डाले तबल बजायकै
एदिल सौं बेदिल हरम कहैं बार बार, अब कहा सोवो सुख सिंहहि जगाय कै
भेजना है भेजो सो रिसालैं शिवराज जूकी, बाजी करनालैं परनालैं पर आयकै

२०

छूटत कमान और तीर गोली बाननके, मुसकिल होति मुरचान हूकी ओटमैं
ताही समै शिवराज हुकुम कै हल्ला कियो, दावा बाँधि परहला बीर भट जोट मैं
भूषन भनत तेरी हिम्मति कहाँ लौं कहौं, किम्मति इहाँ लगि है जाकि भट झोटमैं
ताव दै दै मूछन कँगुरन पै पाँव दै दै, अरि मुख घाव दै दै कूदे परैं कोटमैं

२१

सारस से सूबा करवानकसे शाहजादे, मोरसे मुगल मीर धीरमैं धचै नही
बगुला से बगस बलूचि औ बतक ऐसे, काबिली कुलंग याते रनमै रचै नहीं
भूषन जू खेलत सितारे मैं शिकार संभा, शिवाको सुवन जाते दुवन सचै नहीं
बाजी सब बाजकी चपेटै चंग चहूँ ओर, तीतर तुरक दिल्ली भीतर बचै नहीं

१७

सालेर मुल्हेरच्या युद्धवार्ता श्रवोनी प्रभाहीन झाली मुखें !
वैरी किती विन्मुखी दांत खाती, यशें हिंदु सर्वत्र गाती सुखें !
योद्धे जणो कीटकासारखे संगरीं मारिले शौर्यतेजोबळें !
आरक्त झाले, कुणी अर्धमेले, कुणी हस्त पादाहुनी वेगळे !

१८

वेगें मराठ्यांवरी बादशाही करी पातले कृष्ण मेघापरी !
सह्याद्रि-राजेश्वराचे पहाडी रणीं धावले सिंह त्यांच्यावरी !
फौजा पठाणी अमीरी पळाल्या, सुभा रक्षण्याला न कोणी उभा !
रक्षून सीमा महाराष्ट्र-भूची, कितीदां करी म्लेंछ हीनप्रभा !

१९

चंद्रावळी जावळी चूर केली, गृहीं जाउनी मारिले विघ्नक !
डक्यासवें अफ्जुलासारखाही विजापूरचा मारिला नायक !
' सिंहास या जागवोनी अहाहा ! सुखाची अतां झोंप हो कोठली ? '
मंत्री जनांची सकाळीं दुपारीं शहाच्यासवें चिंतना चालली !

२०

तोफा उडाल्या, तशी बंदुकींची उडे फैर, तों तीरही पातले !
हल्ला कराया शिवाज्ञा जहाली, इमानी उड्या घालती मावळे !
तच्छौर्य-धैर्यास कैसें स्तवावें ? पुढें चालला भूप मोर्चावरी !
ओष्ठावरी दांत रोवून धावे, जवें घालतो घाव यावावरी !

२१

योद्धे बकासारखे बंगशांचे, सुभेदार ते सारसासारखे !
ते शाहजादे जणो क्रौंच पक्षी, तसे शेख जाणा शिखीसारखे !
कोणी शिवाजीसुताच्या शिकारीमधें बापुडा एक ना वाचला !
चारी दिशीं मारिले हो चपेटे, न दिल्लींत कोणी सुखी राहिला !

---

१ मुसल्मानांतील एक जातिप्रकार.

२२

कत्ताकी कराकनि चकत्ताको कटक काटि, कीन्ही शिवराज वीर अकह कहानिया
भूषन भनत तिहु लोकमै तिहारी हाक, दिल्ली औ विलायती सकल बिललानिया
आगरे अगारन है फांदती कगारन छ्वै, बाधती न वारन मुखन कुम्हिलानियां
कीबी कहै कहाँ औ गरीबी गहे भागी जाहि, बीबी गहे सूथनी सुनीबी गहे रानिया

२३

ऊँचे घोर मदिरके अदर रहनवारी, ऊँचे घोर मदरके अदर रहाती है
कंद मूल भोग करैं कंद मूल भोग करैं, तीनि बेर खाती सो तो तीन बेर खाती है
भूषन सिथिल अग भूषन सिथिल अग, बिजन डुलाती तेब बिजन डुलाती है
भूषन भनत शिवराज वीर तेरे त्रास नगन जडाति ते वे नगन जडाती है

२४

सोंधेंको अधार किसमिस जिनको अहार, चारि कोसो अक लक चंद सरमाती है
ऐसी अरीनारी शिवराज बीर तेरे त्रास, पायनमैं छाले परे कदमूल खाती है
ग्रीषम तपनि एती तपती न सुनि कान, कज कैसी कली बिनुपानी मुरझाती है
तोरि तोरि आछेसे पिछौरासों निचोरि मुख, तुमतो कहत कत मुकतामे पानी है

२५

अंदर ते निकसी न मदिरको देख्यो द्वार बिनरथ पथपै उघारे पैर जाती है
हवाहू न लागति ते हवाते बिहालभई, लाखनकी भीरिमे सम्हारती न छाती है
भूषन भनत शिवराज तेरी धाक सुनि, हयादारी चीर फारी मन झुझुलाती है
ऐसी परी नरम हरम बादशाहनकी नासपाती खाती ते बनासपाती खाती है

२२

खड्गें तुवां कापिल्या तुर्क-सेना तुझ्या युद्ध-गोष्टी जगीं निस्तुला !
पाताल-भू-स्वर्गलोकीं प्रसिद्धी तुझी जाहली, दिल्लि ती व्याकुला !
आग्रापुरीची[१] जणे आग झाली, फणी मुक्तकेशीं न लावी नटी !
ऐश्वर्य झालें दरिद्री म्हणोनी दिसे रश्मि कीं ग्रंथि[२] कांता-कटीं !

२३

भोगी सुखें सुंदरी मंदिरीं जी, लपोनी भयें कंदरीं राहते !
जेवीत होती गृहीं तीनदां, ती अतां तीन बोरांवरी राहते !
ग्लानी जिला भूषणांनींच यावी, क्षुधेनें तिचा जीव आतां गळे !
देहावरी डोलवी व्यंजनाला नवांगी वनीं एकली ती पळे !

२४

अंजीर मेवे फलाहार जीचा, वनीं कंदमूळांस ती भक्षिते !
ग्रीष्मर्तुचा ताप कानीं न, तीच्या पदीं फोड आले, तरी धावते !
नेत्रांबरोनी पुशी तोंड सारें, भिजे वस्त्र तें पाहुनी पाहुनी-
'मोत्यांत पाणी वसे' ही प्रियाची विनोदोक्ति ती आठवे गामिनी !

२५

द्वारांतुनी जी न बाहीर आली, जिनें देखिलें मंदिर-द्वार ना !
पायीं न जोडा, बसाया न घोडा, पथीं चालली यावनी अंगना !
लोकोत्तरा ! धाक ऐसा तुझा कीं, किती धीर देती, न त्या थांबती !
थारा न लागे गृहीं बेगमांना, अतां त्याच वाऱ्यावरी धावती !

---

१ आग्रापुरीकडे सबध. २ कमरेचें वस्त्र लहान असलें म्हणजे नेसताना त्याची नुसती गाठ मारतात.

२६

उतरि पलंगते न दीयो है धरापै पग, तेऊ सगबग निशिदिन चली जाती है
अति अकुलाती मुरझाती ना छिपातीगात, बात न सोहाती बोलैं अति अनखाती है
भूषन भनत सिंह साहिके सपूत शिवा, तेरी धाक सुने अरि नारी बिललाती है
कोऊ करै घाती कोऊ रोती पीटि छाती, घरैतीनि बेर खाती तेवै बीनि बेर खाती है

२७

अत्तर गुलाब रस चोवा घनसार, सब सहज सुवासकी सुगंध बिसराती है
पलभरि पलंगते भूमि न धरति पाव, भूली खानपान फिरैं बन बिललाती है
भूषन भनत शिवराज तेरी धाक सुनि, दारा हार बार न सम्हार अकुलाती है
ऐसी परीं नरम हरम बादशाहनकी, नासपाती खाती ते बनासपाती खाती है

२८

साहि शिरताज औ शिपाहिनमै बादशाह, अचल सु सिंधु जैसे जिनके सुभावहै
भूषण भनत परी शत्रु रणसेवा धाक, कांपत रहत न गहत चित चाव है
अथाह जल विमल कलिंदि तट कूल केते, परे युद्ध विपातिके मारे उमराव है
नाव भरि बेगम उतारैं बादी डोंगाभरि, साहि मसकपे उतरत दरियाव है

२९

गढन गॅंजाय गढधरन घसाय, एकै छॉडि दया धरमै दुवारदै भिखारि-से
साहिके सपूत पूत बीर शिवराज सिंह, केते गढधारी किये बनवनचारी से
भूषन बखानै केते दीन्है बंदीखाने शेख, सैयद हजारी गहे रैयत बजारी से
महता-से मुगल महाजन-से महाराज, डॉडि लीन्हे पकरि पठान पटवारी से

३०

डाढीके रखैयनकी डाढी-सी रहति छाती, बाढी जसहद मरजाद हिंदवानेकी
कढि गई रैयतिके मनकी कसक सब, मिटि गई ठसक तमाम तुरकानेकी
भूषन भनत दिल्लीपति दिल धकधका, सुनि सुनि धाक शिवराज मरदानेकी
मोटी भई चंडी बिन चोटीके चबायशीस, खोटी भई सपति चकत्ताके घरानेकी

२६

जी मंचकाहून खालीं न आली, पळे काननीं शत्रु-कांता जवें !
अंगांतुनी घर्म-धारा वहाती, कुचाचें उडे वस्त्र वायूसवें !
बोलावया वेळ नाहीं, वळोनी पहाती, पुढें धावती कामिनी !
हे शाहजी-पुत्रसिंहा ! भयानें कुणी जीव देतात दुर्दैविनी !

२७

भूमीस ना पाय लागे जिचा; कोमला, शामला, व्याकुला धावते !
तेलें गुलाबी, चमेली, सुगंधी तनूला जिनें लाविलीं वाटतें !
कंठांतला हार सांभाळवेना, गती बेगमेची अशी जाहली !
ताजीं फळें खात होती गृहीं, ती वनाहार आता करूं लागली !

२८

शाहाशिरींचा तुरा शोभतो हो, शिपाई जनांचा शहा शोभतो !
गंभीर सिंधूपरी चित्त ज्याचें पहावे रिपूंना न संक्षुब्धतो !
घाई अमीरांस झाली पळाया, परी सूर्य-कन्या मधें आडवी !
नौका स्त्रियांनींच गेल्या भरोनी, अमीरास होडी तरी द्या नवी !

२९

दुर्गास जिंकून दुर्गाधिपांना किती शासिलें, सोडिलें दीन-से !
हे रायदुर्गेश ! दुर्गेश केले तुवां घोर रानांत वेडे पिसे !
उन्मत्त शेखांस त्या सय्यदांना तुरुंगांत त्वां टाकिलें बांधुनी !
तुर्की किती खान संत्रद्ध केले मुखीं मात्र दर्पोक्ति उच्चारुनी !

३०

दाढी जयांच्या मुखीं, दाह त्यांच्या हृदीं लाविला, कीर्ति संवार्धिली !
लोकांतरीं भीति सारी उडाली, अमीरी मिटे ऐट तुर्कीतली !
कानीं पडे नांव हें जों ' शिवाजी ' भयानें उठे झोंपलेला शहा !
चंडी बळी खाउनी पुष्ट झाली, जडे शाह-वंशीं विपत्ती महा !

---

१ शिवाजी २ यमुना

३१

जिन फन फुतकार उडत पहार भार, कूरम कठिन पीठ कमल विदलिगो
विषजाल ज्वालामुखी लवलीन होत जिन,झारन चिकारि मद दिग्गज उगलिगो
कीन्हो जेहि पान पयपान सो जहान कुल, कूरम उछलि जलसिंधु खलहलिगो
खग्ग खगराज महाराज शिवराजजूको, अखिल भुजग मुगलदल निगलिगो

३२

जोरि करि जै है जू मलाहके नरेशपर, तोरि अरिखंड खड सुभट समाजपै
भूषन आसाम रूम बलक बुखारे जै है, चीन सिलहट तरि जलधि जहाजपै
सब उमरावनकी हठ कुराताई देख, कहैं नवरगजेब साहि शिरताजपै
भीख माँगि खैहैं बिनु मनसब रै है पै न जै है हजरत महाबली शिवराजपै

३३

कैयक हजार जहाँ गुर्ज-बरदार ठाढे, करिकै हुस्यार नीति पकरि समाजकी
राजा जशवतको बुलायकै निकट राखे,तेऊ लखै नीरे जिन्हैं लाज स्वामिकाजकी
भूषन बखानै ठेठ कहिये गुसलखाने, सिंहलौं झपट गुनि साहि महाराजकी
हटकि हथ्यार फड बाधि उमरावनको, लीन्हि तब भेट नौरगनके शिवराजकी

३४

सबनके ऊपरही ठाढो रहिबेके जोग, ताहि खरो कियो जाय जारनके नियरे
जानि गैर मिसिल गुसिले गुसा धरि मन कीन्हो ना सलाम न बचन बोले सियरे
भूषन भनत महाबीर बलकन लाग्यो, सारी पातशाहीके उडाय गये जियरे
तमकतें लाल मुख शिवाको निरखि भयो, स्याह मुख नौरग सिपाह मुख पियरे

३१

फूत्कार ज्याच्या फणेचा सुटे तों उडे शैलराजी, चळे कच्छही !
ज्वालामुखी लीन होती जयाला, वडे दिग्गजांचा मदस्रावही !
जेव्हां घडे यत्पय:पान तेव्हां उफाळे पयोधी खळाळे महा !
साताऱ्चा खड्ग-नाग प्रतापी गिळी मोंगली सैन्य-नागांस हा !

३२

जाऊं मलाया पतीला हराया सभेमाजि या पैज लावोनिया !
आसाम वा चीन कोचीन देशीं चढाई करूं सिंधु लंघोनिया !
औरंगशाहा महानिग्रही तो, पुन्हां सांगती खान त्याला परी-
' पाठीव कोठें करूं चाकरीला, ' न जाऊं शिवाजी वालिष्ठावरी !

काबूल, खोकंद किंवा बुखारा, खिवा खान तेथील जिंकू बलें !
रूमावरी धूम ठोकून तेथें लडायास आहों अम्ही आगळे !
औरंगशाहा महानिग्रही तो पुन्हां सांगती खान त्याला परी–
मागून भिक्षा भरूं पोट आम्ही, न जाऊं शिवाजी बलिष्ठावरी !

३३

जेथें महाशूर योद्धे हुषारी धरोनी उभे नीति सांभाळुनी !
राजा [1]यशोवत मध्यस्थ होता, सभेमाजि घेई तया ठेवुनी !
शाहास आधीं कुणी गोष्टि सांगे, 'न जाणो शिवा झांप टाकील हा !'
तख्तापुढें बांधिलीं तीव्र शस्त्रें शिवाची तदा भेट घेई शहा !

३४

सर्वांवरी स्थान ज्याचें, तयाला दिलें स्थान खालीं सभाभ्यंतरीं !
केली सलामी न शाहास तेथें, दिसे कोपला सिंह रूपांतरीं !
हा हा ! उडे जीव तेव्हां सभेचा महावीर जेव्हां उफाळू बघे !
लाली चढे जों शिवाच्या मुखाला, शहाच्या मुखीं कृष्णता स्थान घे !

१ यशवतसिंग. २ औरंगजेब व शिवाजीमहाराजाची भेट.

३५

दाराकी न दौर यह रारि नहीं खजुवेकी, बाँधिबो नहीं है कैधौं मीर सहवालको
मठ विश्वनाथको न बास ग्राम गोकुलको, देवीको न देहरा न मंदीर गुपालको
गाढे गढ लीन्हे अरु बैरी कतलाम कीन्हे, ठौर ठौर हासिल उगाहल है सालको
बूडति है दिल्ली सो सम्हारै क्यों न दिल्लिपती, धक्का आनि लाग्यो शिवराज महाकालको

३६

किबलेके ठौर बाप बादशाह शाहजान, ताको कैद कियो मानो मक्के आगिलाईहै
बडो भाई दारा वाको पकरिकै कैद कियो, मेहेरहु नाहि माको जायोसगो भाईहै
बधु तो मुरादबक्स बात चूक करिबेको, बीचलै कुरान खुदाकी कसम खाईहै
भूषन सुकवि कहै सुनौ नवरंगजेब एते काम कीन्हे फेरबादशाही पाई है

३७

हाथ तसबीह लिए प्रात उठि बदगीको, आपही कपटरूप कपट सु जपके
आगरेमैं जाय दारा चौकमैं चुनाय लीन्हो, छत्रही छिनायो मानो बूढे मरेबापके
कीन्होहै सगोत घात सोमैं नाहिं कहौं फेरि, पीलपै तुरायो चारि चुगुलके गपके
भूषन भनत शठछंदी मतिमंद महा, सौ सौ चूहे खायकै बिलारी बैठी तपके

३८

राना भो चमेली और बेला सब राजा भए, ठौर ठौर रसलेत नित यह काज है
सिगरे अमीर आनि कुंद होत घर घर, भ्रमत भ्रमर जैसे फूलनकी साज है
भूषन भनत शिवराज बीर तैंही देश देशनमें राखी सब दच्छिनकी लाज है
त्यागे सदा षटपद पद अनुमानि यह, अलि नवरंगजेब चंपा शिवराज है

३९

कूरम कमल कमधुज है कदमफूल, गौर है गुलाब राना कतकी बिराज है
पांडरी पवार जूही सोहत है चंद्रावल, सरल बुंदेला सो चमेली साजबाज है
भूषन भनत मुचकुंद बडगुजर है, बघेले बसत सब कुसुमसमाज है
लेइ रस एतेनको बैठि न सकत अहै, अलि नवरंगजेब चंपा शिवराज है

३५

दारा पळे दीन, ही दौड त्याची न, शाहासुजाची लढाई न ही !
काशीपतीचें नसे गेह हें, कीं नसे सर्वथा गोकुळग्रामही !
शौर्यें इथें जिंकिले दुर्ग सारे, तशा कसली उग्र केल्या किती !
दारावरी काळ झाला शिवाजी, सुरक्षी न कां दिल्लि दिल्लीपती ?

३६

स्वामी कुटुंबांतला बाप तूझा शहाजान, तूं कैद केलें तया !
दारा तुझा ज्येष्ठ बंधू असोनी तया कैद केलें, न आली दया !
विश्वास ये ना मुरादास तेव्हां कुराणावरी हात तूं ठेविला !
औरंगजेबा ! असें पाप केलें तदा बादशाही मिळाली तुला !

३७

पापी स्वयंरूप तूंची असोनी प्रभातीं जपध्यान आरंभिलें !
दारा दिनीं त्यास तूं ठार केला, पित्याचें शिरच्छत्रही हारिलें !
केली किती गोलहानी कधीं मी न खोट्या जनांना शिरीं घेउनी !
मार्जार भक्षोनिया मूषकांना टपोनी पुन्हां बैसलें आसनीं !

३८

राणे चमेलीपरी, तंवि राजे जगों पुष्पवेलीपरी जाहले !
कुंदापरी मीर झाले जयांच्या अलीनें मरंदास सशाशिलें !
देशांतुनी रक्षिली दक्षिणेची जनीं लाज एका शिवानें परी !
औरंग हा भृंग सर्वत्र बैसे, बसेना जिजापुत्र-चाफ्यावरी !

३९

राठोड राजे कदंबाप्रमाणें, सिसोदी सरोजापरी जाहले !
राणे जगो केतकीवृंद जाणा, शिरीषापरी चांदिले बुंदिले !
वाघेल राजे वसंतापरी, हा मधु प्राशि औरंग भृंगापरी !
गुं गुं करी भोंवतीं, नाच बैसे परी भोसले-चंपकाच्यावरी !

४०

मोरग कुमाऊँवौ पलाउ बाधे एक पल, कहाँलों गिनाऊ जेते भूपनके गोत है
भूषन भनत गिरी विकट निवासी लोग, बावनी बवजा नव कोटि धुध होते है
काबुल कंधार खुरासान जेर कीन्हो जिन, मुगल पठान शेख सय्यदहु रोतहै
अबलगि जानत है बडे होत बादशाह, शिवराज प्रगटेते राजा बडे होत है

४१

इंद्र जिमि जंभपर बाडव सुअंभपर, रावन सदंभपर रघुकुलराज है
पौन वारिवाहपर शंभु रतिनाहपर, ज्यो सहस्रबाहपर राम द्विजराज है
दावा द्रुमदंडपर चीता मृग झुंडपर, भूषन वितुंडपर जैसे मृगराज है
तेज तम अंशपर कान्ह जिमि कंसपर, त्यों म्लेंच्छ वंशपर शेर शिवराज है

४२

शक्र जिमि शैलपर अर्क तमफैलपर, विघनकी रेलपर लंबोदर लेखिये
राम दशकंधपर भीम जरासंधपर, भूषन ज्यों सिंधुपर कुंभज बिसेखिये
हर ज्यों अनंगपर गरुड भुजंगपर, कौरवके अंगपर पारथ ज्यों पेखिये
बाज ज्यों विहंगपर सिंह ज्यों मतंगपर, म्लेंच्छ चतुरंगपर शिवराज देखिये

४३

वारिधिके कुंभभव घन बन दावानल, तरुन तिमिरहूके किरन समाज हौ
कंसके कन्हय्या कामधेनुहूके कंटकाल, कैटभके कालिका विहंगमके बाज हौ
भूषन भनत जगजालिमके शचिपती, पन्नगके कुलके प्रबल पक्षिराज हौ
रावनके राम कार्तवीर्यके परशुराम, दिल्लीपति दिग्गजके सिंह शिवराज हौ

३८२६

४०

मोरंग[1] राजे, कुमाऊं[2] पहाडी क्षणीं बांधिले आत्मसंघासवें !
जे धुंद होते तयां गुंग केलें; उडाले पळाले गळाले भये !
काबूल कंधार देशीं उदासी दिसे, ऐकुं ये सय्यदी रोदन !
जी थोरवी बादशहास लाधे, अतां तीच राजास देती जन !

४१

जंभावरी इंद्र, लंकापतीच्यावरी कीं जसा जानकीचा पती,
मेघावरी वायु, कामावरी कीं महादेव— ज्याची तपाची रती,
दुःशासनाच्यावरी भीम, किंवा कन्हय्या जसा दुष्ट कंसावरी,
हा भोसले भूप गाजी शिवाजी तसा भूतलीं म्लेंच्छवंशावरी !

४२

श्रीशंभु जैसा अनंगावरी कीं जसा बाज[3] पक्षी विहंगावरी,
शार्दूल किंवा कुरंगावरी कीं जसा केसरी तो मतंगावरी,
पक्षीश किंवा भुजंगावरी कीं दवाग्नि जसा वृक्षदंडावरी,
चिंतामणी विघ्न-संघावरी हा शिवाजी तसा म्लेंच्छवृंदावरी !

४३

अंभोनिधीचे अगस्ती तुम्ही, कीं वनाचे दवाग्नि, तमाचे रवी !
कंसासुराचे कन्हय्या, खगांचे जणो बाज, कीं पर्वतांचे पवी[4] !
जंभासुराचे शचीनाथ तुम्ही, अहीच्या कुलाचे विहंगेश्वर[5] !
औरंग दिग्नाग गाजे तयाचे तुम्ही सिंह कुंभस्थ मुक्ताहर !

---

१ कुचबिहारच्या पश्चिमेस हें संस्थान होतें. २ कमाऊन. (गढवाल)
३ बहिरी ससाणा. ४ वज्र. ५ गरुड.

४४

कुंभकर्ण असुर औतारी अवरंगजेब, कीन्ही कत्ल मथुरा दोहाई फेरी रबकी
खोदि डारे देवि देव शहर मुहल्ला बाके, लाखन तुरुक कीन्हे छूटि गई तबकी
भूषन भनत भाग्यो काशीपति विश्वनाथ, और कौन गिनतीमैं भूली गति भवकी
चारौं बर्न धर्म छोडि कलमा नेवाज पढि, शिवाजी न होतो तौ सुनति होति सबकी

४५

साँच को न मानै देवी देवता न जानै, अरु ऐसी उर आनै मैं कहत बात जबकी
और पातशाहनके हुती चाह हिंदुनकी, अकबर शाहजहा कहैं साखि तबकी
बब्बरके तिब्बर हुमायूँ हद्द बाधि गये, दो मैं एक करी ना कुरान बेद ढबकी
काशिहुकी कला जाती मथुरा मसीद होती, शिवाजी न होतो तौ सुनति होती सबकी

४६

देवल गिरावते फिरावते निशान आली, ऐसे डूबे राव राने सबी गये लबकी
गौरा गनपति आप औरनको देत ताप, आपके मकान सब मारि गये दबकी
पीरा पयगंबरा दिगंबरा दिखाई देत, सिद्धकी सिधाई गई रही बात रबकी
काशिहुते कला जाती मथुरा मसीद होती, शिवाजी न होतो तौ सुनति होति सबकी

४७

बेद राखे बिदित पुराण राखे सारयुत, राम नाम राख्यो अति रसना सुघरमैं
हिंदुनकी चोटी रोटी राखी हैं सिपाहिनकी, काँधे मै जनेउ राख्यो माला राखी गरमैं
मीडि राखे मुगल मरोडि राखे पातशहा, बैरी पीसि राखे बरदान राख्यो करमैं
राजनकी हद्द राखी तेगबल शिवराज, देव राखे देवल स्वधर्म राख्यो घरमैं

४८

मारि करि पातशाही खाकसाही कीन्हो जिन, जेर कीन्हो जोरसों लै हद्द सब मारेकी
खिसि गई शेखी फिसि गई सुरताई सब, हिसिगई हिम्मति हजारों लोक प्यारेकी
बाजत दमामे लाखौं धौंसा आगे धुर जात, गरजत मेघ ज्यों बरात चढे भारेकी
दूल्हो शिवराज भयो दच्छिनी दमामेवाले, दिल्ली दुलहिनी भई शहर सितारेकी

४४

औरंग हा कुंभकर्णावतारी, करी गोकुळीं निर्दयी कत्तल !
देवी महादेव तीर्थें खणोनी किती भ्रष्टतेची करी दंगल !
काशीपती शंभु तोही पळाला, दुजांची कथावी गती काय ती ?
होता शिवाजी न, सर्वत्र होत्या जनांच्या तरी भारतीं सुन्नती !

४५

जे मानिती सत्य ना देव देवी, स्थिती सांगतों म्लेंच्छ-कालांतलीं,
पूर्वीं चहा होति हिंदू जनांची हुमायूशहा-पुत्र-कालीं भली,
वेदांत-सीमा हुमायूं न मोडी, न मोडीहि तत्पुत्र तो सन्मती,
औरंगकालीं शिवाजी न होता, तरी सत्य होत्या अहा सुन्नती !

४६

देवालयें भग्न केलीं, मशीदी तिथें बांधिल्या, प्रार्थना चालल्या !
गौरीगणेशादि ना ताप देती इथें देवता स्तब्धता पावल्या !
सिद्धी जणो संपली साधुतेची असें पीरजादे जगीं दाविती !
काशी, अयोध्या कलाहीन होत्या, शिवानें न होऊं दिल्या सुन्नती !

४७

त्वां राक्षिले वेद, तैशीं पुराणें, मुखीं रामनामासही राक्षिलें !
हिंदी-शिखा राक्षिली हिंद-भूपा ! गळ्याचें अहा ! जानवें राक्षिलें !
दिल्ली विजापूरशाही लुटोनी करीं राखिलें दान कर्णासम !
देवालयीं राक्षिले देव राया ! गृहीं राक्षिला धर्म सर्वोत्तम !

४८

मारी, करी खाक ती बादशाही, बळें घेतलीं मोरच्यांचीं स्थळें !
शेखी पळाली, गळाली अहंता, अमीरांतली धीरता मावळे !
वाद्यें किती वाजती शिंग-भेरी, पयोदावलीचा जणो घोषची !
स्वारी शिवाची वराची निघाली, जहाली स्नुषा दिल्लि सातारची !

४९

दावा बादशहानसों कीन्हों शिवराज वीर, जेर कीन्हों देश हद बांध्यो दरबारेसे
हठी मरहठी तामैं राख्यो ना मवास कोऊ, छीने हतियार डोलै बन बनजारेसे
आमिष अहारी माँसहारी दै दै तारी नाचै, खांडे तोड किरचैं उडाये सब तारेसे
पील सम डील जहां गिरिसे गिरन लागे, मुड मतवारे गिरैं झुड मतवारेसे

५०

गरुडको दावा सदा नागके समूहपर, दावा नागयूथपर सिह शिरताजको
दावा पुरहूतको पहारनके कुलपर, पक्षिनके गनपर दावा सदा बाजको
भूषन अखड नवखंड महिमडलमैं, तमपर दावा रविकिरन समाजको
पूरब पच्छाँह देश उत्तरते दच्छिनलौं, जहाँ पातशाही तहाँ दावा शिवराजको

५१

( सवाई. )

दक्षिण जीतलियो दल केवल, पश्चिम जीतके चामर राख्यो
रूप गुमान हर्‍यो गुजराथको, सूरतको रस चूसके चाख्यो
पंजन पेलि मलिच्छ मले सब, सोई बच्यो जेहि दीन व्है भाख्यो
सो रंग है शिवराज बली, जिन नौरगमैं रग एक न राख्यो

५२

( कवित्त. )

सपत नगेश आठों ककुभ-गजेश, कोल कच्छप दिनेश धरैं धरनि अखडको
पापी घालैं धरम सुपथ चालै मारतड, करतार प्रनपालैं प्राणिनके चडको
भूषन भनत सदा सरजा शिवाजी गाजी, म्लेच्छनको मारि करि कीरति घमडको
जगकाज वारे निहचिंत करि डारे, सब भोर देत आशिष तुम्हारे भुजदडको

४९

द्दावा धरोनी शहा जेर केले, रची राज्य-सीमा स्वतेजोबलें !
बेलागही जिंकिले सर्व किल्ले, विशाळी रिपूंना वनीं हांकिलें !
संहारिले लाचखाऊ भुडाऊ, अहंता जिवांच्या सवें हारिली !
शैलापरी मत्त मातंगमाला पडे झुड-शी रुंडमुंडावली!

५०

सर्पावरी वैर पक्षीश्वराचें सुविख्यात लोकांत आहे जसें,
दंतीवरी वैर पंचाननाचें समस्तांस लोकांस ठावें असे !
अद्रीवरी वैर आखंडलाचें[1] तमाच्यावरी कीं रवीचें जसें,
गाजे जिथें बादशाही अहाहा ! तिथें वैर तैसें शिवाचें दिसे !

५१

सेनाबळें जिंकिलें दक्षिणेला, करी पश्चिमा चामरासारखी !
सौंदर्य तें हारिलें उत्तरेचें, प्रभा ठेविना सूरतेच्या मुखीं !
म्लेंच्छास ठेवी बलानें मळोनी, पदीं जाहला नम्र तो बांचला !
नौरंगिं ना एकही रंग राखी, शिवाजी असा रंग हा खेळला !

५२

श्रीशेष दिग्नाग दिक्पाळ तैसा दिनस्वामि पृथ्वीस संरक्षितो !
पापी विमार्गी, सुमार्गी रवी तो जगज्जीवनालाच कीं तापतो !
भूपोत्तमा ! भोसले-भूषणा ! तूं यश स्थापिलें म्लेंच्छ संहारुनी !
केलें जगत्कार्य, शोभे तयानें तुझ्या बाहुला धन्यता कामिनी !

---

१ इंद्राचें.

[library stamp] ३६२८

# शिवप्रताप-काव्य

समाप्त.

# तिवारींचीं पुस्तकें.


| | | |
|---|---|---|
| * | १ काव्यकुसुमांजलि. ( शिल्लक नाहीं. ) ... | =१० |
| | २ काव्यरत्नमाला. .. ... .. | २॥ |
| | ३ मनोहरलीला. ( खंडकाव्य. ) ... | =६ |
| * | ४ प्रसन्नराधा. ( " ) ... ... | =६ |
| * | ५ महाराणा प्रतापसिंह. ( " ) .. . | =८ |
| | ६ मान्यांची यमुना. ( " ) ... ... | =६ |
| | ७ अभंगमाला.... ... ... .. | =४ |
| | ८ कविता-वनिता. .. .. ... | =८ |
| | ९ मराठ्यांचीं संग्रामगीतें. | |
| | ( ४थी आवृत्ति सचित्र छापत आहे. ) ... | =१० |
| | १० झांशीची संग्रामदेवता. ( आ० २ री. ) ... | =८ |
| * | ११ राधामाधव. ( खंडकाव्य. ) .. .. | =१० |
| | १२ चंडीशतक. ... .. ... ... | =१२ |
| | १३ कुमुद्वती. ... ... .. ... | =८ |


---

पहिलीं ८ पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत. व पहिल्या आठ पुस्तकास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

१।२।५।६।७ या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* या पुस्तकास दक्षिणाप्राईझ कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत.

सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्ते—

१ दु० आ० तिवारी. जळगाव-पू० खान्देश.

२ परचुरे पुराणिक मण्डळी, माधवबाग-मुम्बई नं० ४

# काव्यकिरणमाला

( सं० व प्र०—मि० का० भोरटके )

## अगाऊ वर्गणी ५॥ रु०

वरील वर्गणींतून -।।।- प्रवेश फी वजा जातां बाकीच्या ४।।। रु० ची फेड सरासरी दर तीन महिन्यानीं पुस्तकरूपानें केली जाईल. मालेंतील पुस्तकांची किंमत -।- पासून -॥- पर्यंत ठेविली जाईल व मालेच्या ग्राहकांस मालेचें प्रत्येक पुस्तक ३/४ किं० स मिळेल.

मालेंतून आतापर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य ) | ... | -॥- |
| २ | मान्यांची यमुना ( " ) | ... | -।= |
| ३ | चंडीशतक ... | ... | -।।।- |
| ४ | कविता—वनिता . . | ... | -॥- |
| ५ | कुमुद्वती | ... | -॥- |
| ६ | शिवप्रताप ... | ... | -।= |

हीं सर्व पुस्तकें श्री० कवि तिवारी यांचीं आहेत.

मि० का० भोरटके, जळगांव—पू० खान्देश.

REFBK-0003726

3602